# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990



Bharat Chandak

SATYA ELECTRICALS

POLYCAB Racold legrand HAVELLS Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS

Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512

Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018

Email:satyaelectricals@rediffmail.com



लातूर वर्ष ३ रे अंक २५२ वा मंगळवार दि.१२ मार्च २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# काँग्रेसची विकासकामे उजळ माथ्याने लोकांपर्यंत घेऊन जावू

## आमदार धिरज देशमुख यांचे काँग्रेस कार्यकर्ता मेळाव्यात आवाहन; काँग्रेसचा उमेदवार निवडून आणल्याशिवाय आपल्याला स्वस्थ बसायचे नाही

लातूर : लोकसभा निवडणुकीत लातूरसाठी काँग्रेस पक्ष जो उमेदवार देईल त्यांना निवडून आणल्याशिवाय आपल्याला स्वस्थ बसायचे नाही. त्यासाठी घरोघरी जावून काँग्रेसने आजवर केलेली विकासकामे उजळ माथ्याने लोकांपर्यंत घेऊन जावू. तसा संकल्पच आपण सर्व कार्यकर्त्यांनी करूया, असे आवाहन 'लातूर ग्रामीण'चे आमदार व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी सोमवारी (ता. ११) येथे केले. आगामी लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने श्रीमती सुशीलादेवी देशमुख महाविद्यालयाच्या प्रांगणावर रेणापूर आणि औसा तालुक्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजिण्यात आला होता. यावेळी आमदार श्री. धिरज देशमुख यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष व लातूर जिल्ह्याचे लोकसभा निरीक्षक श्री. रामहरी रूपनवर, माजी आमदार श्री. त्र्यंबक भिसे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष श्रीशैल उटगे, काँग्रेसचे शहराध्यक्ष किरण जाधव यांच्यासह काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व असंख्य कार्यकर्ते मेळाव्याला उपस्थित होते. आमदार श्री. धिरज देशमुख म्हणाले, 'अच्छे दिन'ची घोषणा

पुढचे पंतप्रधान राहुल गांधी असतील, यादृष्टीने कामाला लागू लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने आपल्या मतदारसंघात व लातूर जिल्ह्यात कार्यकर्ता मेळावा घेवून कार्यकर्त्यांना नवी ऊर्जा, नवा विश्वास देण्याचे काम आमदार धिरज देशमुख यांनी केले आहे. अशा प्रकारचे मेळावे काँग्रेसच्या सर्व आमदारांच्या मतदारसंघात झाले पाहिजेत, असे प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष श्री. रामहरी रूपनवर यांनी सांगितले. भारतात दडपशाही वाढल्याने न्यायालय आणि मतदान या दोनच यंत्रणा आता लोकांच्या हातात आहेत. त्यामुळे जागरूक राहून मतदान करूया. देशाला वाचविण्यासाठी पुढचे पंतप्रधान राहुल गांधी असतील, यादृष्टीने कामाला लागू, असे आवाहनही त्यांनी कार्यकर्त्यांना यावेळी केले.

दिलेल्यांना जनतेने मोठ्या विश्वासाने बहुमत देवून सत्तेत बसवले. पण, त्यांनी १० वर्षात काय केले? देशात महागाई, बेरोजगारी, असुरक्षितता वाढवली. आता त्यांच्या भुलथापांना बळी न पडता जुने ते सोने ही म्हण लक्षात ठेवून आपल्याला देशात सोन्याचे दिवस (काँग्रेसचे) आणायचे आहेत. त्यासाठी सर्वांनी अंग झटकून कामाला



लागावे. आपापल्या बुथवर बारीक लक्ष ठेवावे. गाफील राहू नये. लोकशाहीला वाचविण्यासाठी देशाला आज तुमची गरज भारताचे संविधान बदलण्यासाठी लोकसभा निवडणुकीत भाजपला ४०० पेक्षा अधिक जागा जिंकायच्या आहेत. यासाठीच त्यांचा अट्टाहास सुरु आहे. त्यामुळे निडणुकीच्या माध्यमातून मिळालेल्या संधीचे आपण सोने करूया. देशाला घडविण्यासाठी, लोकशाहीला आणि संविधानाला वाचविण्यासाठी देशाला तुम्हा सर्वांची आज गरज आहे. प्रत्येकानी सुजाण नागरिक म्हणून आपली जबाबदारी पार पाडावी. काँग्रेसला आणि राहुल गांधी यांना भक्कमपणे साथ द्यावी, असे आमदार श्री. धिरज देशमुख यांनी सांगितले. सर्जेराव मोरे, जगदीश बावणे, विजय देशमुख, अनुप शेळके, उमाकांत खलंग्रे, अनंतराव देशमुख, चंद्रचूड चव्हाण, पृथ्वीराज शिरसाठ, रमेश सूर्यवंशी, माणिकराव सोमवंशी, स्वाती सोमाणी, प्रमोद जाधव, शेषराव हाके पाटील, विश्वास देशमुख, पाशामियाँ शेख, पूजा इगे, तुकाराम खोले, सुभाष घोडके, हणमंत पवार, बी आचार्य आदी उपस्थित होते.

यावेळी रेणापूर गोरसेनेचे विलास राठोड, सतीश राठोड यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. प्रास्ताविक प्रवीण पाटील यांनी केले. सूत्रसंचालन दिनेश नवगिरे, विश्वनाथ कागले यांनी केले.

# लातुरकरांच्या आशीर्वादाचं फलित म्हणजे मराठवाडा रेल्वे कोच कारखाना- आ.संभाजी पाटील निलंगेकर

### वंदे भारतची निर्मिती


लातूर येथे सुरु होणार्या रेल्वे बोगी कारखान्यात जगात लोकप्रिय ठरलेल्या व सर्वाधिक मागणी असणार्या वंदे भारत कोचची तसेच वंदे भारतच्या स्लीपर कोचची निर्मिती होणार आहे. लातूर येथे तयार होणारे कोच देशात व जगात जाणार आहेत. त्यामुळे लातुरचे नाव जगभर होणार असल्याचे आ.निलंगेकर यांनी सांगितले.






लातूर/प्रतिनिधी: लातूर येथे उभा राहिलेला मराठवाडा रेल्वे कोच कारखाना म्हणजे लातूरकरांच्या आशीर्वादाचे फलित आहे. या कारखान्याचे मंगळवार दि.१२ मार्च रोजी देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण होणार असल्याची माहिती माजी मंत्री आ.संभाजी पाटील निलंगेकर यांनी दिली. आ.निलंगेकर म्हणाले की,२०१७-१८ या कालावधीत लातूरकर जनता भाजपाच्या पाठीशी उभी राहिली.या काळात लोकसभा, विधानसभा, महानगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समित्यांसह नगरपंचायतीमध्ये जनतेने भाजपाला निवडून दिले. या पाठबळावर आम्ही राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे लातूर येथे रेल्वे बोगी कारखाना सुरू करण्याची विनंती केली. देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, तत्कालीन रेल्वेमंत्री पीयुष गोयल यांच्याकडे आमच्या भावना पोहोचवून पाठपुरावा केला. लातूरकरांसाठी रेल्वे बोगी कारखाना मंजूर करून घेतला.लातूरच्या जनतेने भाजपावर आणि आमच्यावर विश्वास व्यक्त केला.त्यामुळे आम्ही पक्ष नेतृत्वाकडे आग्रह धरला. वरिष्ठ नेत्यांनी त्याची देखील घेतली.या सर्वांचे फलित म्हणूनच लातूर येथील रेल्वे बोगी कारखान्याचे मंगळवारी (दि.१२) लोकार्पण होत असल्याचे आ.निलंगेकर म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मंगळवारी सकाळी ८ वाजता आभासी पद्धतीने लोकार्पणाचा कार्यक्रम संपन्न होणार आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, राज्यमंत्री रावसाहेब दानवे- पाटील,राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे देखील ऑनलाइन माध्यमातून या कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत.याशिवाय जिल्ह्यातील खासदार, आमदार व मान्यवर नेत्यांची उपस्थिती कारखानास्थळी राहणार असल्याचे आ. निलंगेकर यांनी सांगितले. लातूर परिसरात रोजगार निर्मिती व्हावी,या भागातील तरुणांना रोजगारासाठी स्थलांतर करावे लागू नये यासाठी हा कारखाना व्हावा यासाठी आम्ही पाठपुरावा केला होता. तो सफल झाला आहे.या माध्यमातून जिल्ह्यात हजारो कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे.त्यामुळे आता जिल्ह्यातील तरुणांना रोजगारासाठी बाहेर जावे लागणार नाही. जिल्ह्यातच मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होणार आहे. रेल्वे बोगी कारखान्यास लागणार्या इतर साहित्य निर्मितीचे उद्योग जिल्ह्यातच सुरु होणार आहेत. त्यामुळे जिल्ह्याच्या विकासाला हातभार लागणार आहे.जिह्यातील तरुणांना स्वतः उद्योग उभे करण्यास पोषक वातावरण निर्माण होणार आहे.यामुळे लातूर जिल्ह्याचा चेहरा मोहरा बदलणार असल्याचेही आ.निलंगेकर यांनी सांगितले. जिल्ह्याचा कायापालट करणार्या या कारखान्याच्या शुभारंभास जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आ.निलंगेकर यांनी केले आहे.

# अग्नी क्षेपणास्त्र ५ ची यशस्वी चाचणी



नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवार दि. ११ मार्च रोजी डीआरडीओच्या शास्त्रज्ञांच्या नव्या यशस्वी चाचणीबद्दल शुभेच्छा दिल्या आहेत. डीआरडीओने मिशन दिव्यास्त्रची यशस्वी चाचणी केली आहे. पंतप्रधान मोदींनी डीआरडीओ शास्त्रज्ञांचे मिशन दिव्यास्त्र या नावाने स्वदेशी बनावटीच्या अग्नी-५ क्षेपणास्त्राची पहिली उड्डाण चाचणी यशस्वीरीत्या पार पाडल्याबद्दल अभिनंदन केले आहे. डीआरडीओ म्हणजे संरक्षण संशोधन आणि विकास संस्था. डीआरडीओच्या आणखी एका यशस्वी चाचणीसाठी शुभेच्छा देत मोदींनी शुभेच्छा दिल्या आहेत.पंतप्रधान मोदींनी अधिकृत एक्स मीडिया अकाऊंटवर ट्वीट करत म्हटले आहे की मिशन दिव्यस्त्रासाठी आमच्या डीआरडीओ शास्त्रज्ञांचा अभिमान आहे, मल्टिपल इंडिपेंडेंटली टार्गेटेबल री-एंट्री व्हेईकल तंत्रज्ञानासह स्वदेशी विकसित अग्नी-५ क्षेपणास्त्राची पहिली उड्डाण चाचणी यशस्वी असे मोदींनी ट्विटर पोस्टमध्ये म्हटले आहे. मिशन दिव्यास्त्र अंतर्गत अग्नी-५ क्षेपणास्त्राची पहिली उड्डाण चाचणी यशस्वी झाली आहे.या क्षेपणास्त्रामध्ये मल्टीपल इंडिपेंडेंटली टार्गेटेबल री-एंट्री व्हेईकल तंत्रज्ञान आहे. अचूक लक्ष्य भेदण्यासाठी याचा वापर होतो.

# कवठा केज -भादा रस्त्याचा चाळीस वर्षापासूनचा प्रश्न महायुती शासनाच्या माध्यमातून निकाली - आ. कराड

लातूर - गेल्या अनेक वर्षापासून स्वतः च्या गावचा रस्ता करू शकले नाहीत, केवळ नेत्याचे तुंनतूने वाजवणारे काँग्रेसचे गावचे पुढारी जिल्ह्याचे राजकारण करत आहेत, यांना गावच्या प्रश्नाशी काहीही घेणं देणं नाही असा आरोप करून गेल्या ३५ ते ४० वर्षापासूनचा कवठा केज - भादा रस्त्याचा प्रश्न जनतेच्या मागणीनूसार तातडीने राज्यातील महायुती शासनाच्या माध्यमातून निकाली काढला असल्याचे प्रतिपादन भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी केले.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भादा सर्कल मधील मौजे कवठा केज येथील कवठा केज ते भादा रस्त्याचे भूमिपूजन, जलजीवन मिशन पाणीपुरवठा योजनेअंतर्गत टाकीचे भूमिपूजन, सिमेंट रस्ता, नाली बांधकाम, जिप शाळा आणि अंगणवाडी दुरुस्ती कामाचे लोकार्पण यासह विविध तब्बल ३ कोटी १५ लक्ष रुपये खर्चाच्या विविध विकास कामाचे लोकार्पण आणि भूमिपूजन भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या शुभहस्ते मोठ्या उत्साहाच्या वातावरणात करण्यात आले. या कार्यक्रमात गावातील महिला पुरुषांनी मोठा सहभाग घेतला होता.




यावेळी बोलताना आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की केंद्र शासन आणि राज्य शासनाच्या माध्यमातून महामार्गावर आले असल्याचे बोलून दाखविले.

यानंतर भाजपा... 

याप्रसंगी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, ओबीसी मोर्चाचे प्रदेश सचिव भागवत सोट, प्रदेश भाजपाचे सतिश आंबेकर, जिल्हा उपाध्यक्ष पद्माकर चिंचोलकर, बालाजी शिंदे, सुधाकर गवळी, गुणवंत करंडे, महादेव मुळे, रविंद्र पाटील, उद्धव काळे, महादेव गुरशेट्टे, सतिश कात्रे, राम पटणे, बालाजी साळुंके, ॲड. धनराज शिंदे, लालासाहेब पाटील, लक्ष्मीकांत घुटे, वाजिद पठाण, कवठा केजचे सरपंच गिरीधर पवार, प्रशांत गोरे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी उपसरपंच अरुण व्हदाडे, युवा धडाडीचे कार्यकर्ते राहुल गोरे यांच्यासह अनेकांनी भारतीय जनता पार्टी जाहीर प्रवेश केला.

लातूर ग्रामीण मतदार संघातील गावागावात वाडी वस्तीत लाखो नव्हे तर कोट्यावधी रुपयाचा निधी आणण्यात यश आले. या निधीतून विकासाची कामे मोठ्या प्रमाणात होत आहेत विकासापासून कोसोदूर असलेल्या कवठा केज गावात वैयक्तिक लाभाच्या योजने बरोबरच सार्वजनिक विकासाला गती मिळाली आहे. केंद्र शासनाचा शक्तीपीठ महामार्ग कवठा केज गावातून जात असल्याने हे गाव विकासाच्या

लातूर ग्रामीण मतदार संघात काँग्रेस आमदारांनी गेल्या पंधरा वर्षात विकासाचा किती निधी आणला, कोणती कामे केली जनतेला जाहीर सांगावे गेल्या तीन वर्षात मी आणलेला निधी त्यांच्याहून निश्चितपणे अधिकच आहे असे सांगून शासनाच्या विविध योजनेची माहिती देऊन गावच्या आणि परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी येणाऱ्या काळात होणाऱ्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला आशीर्वाद द्यावेत काँग्रेसच्या भूलथापांना बळी पडू नये असे आव्हान आ. रमेशअप्पा कराड यांनी केले.

याप्रसंगी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, सरपंच गिरीधर पवार यांनी आपले मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामकिशन गोरे यांनी केले यावेळी गोविंद मोहिते, राजसाब गाडे, संजय बनसोडे, व्यंकट रसाळ, रामकिशन गोरे, अविनाश गोरे, शरद मिसाळ, शशिकांत व्हदाडे, गोविंद जाधव, नवनाथ गोरे, शरद बागमोडे, बंडू मस्के, योगेश लुटुरे, अर्जुन लटुरे, गोरख बनसोडे, सुधीर पाटील, श्रीकृष्ण पवार, विश्वजीत घुट्टे, श्रीकांत जाधव, कल्याण घुट्टे, जयराम गोरे यांच्यासह अनेक गावचे सरपंच लोकप्रतिनिधी कवठा केज येथील महिला पुरुष ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# किनवट तालुक्यातील सिंगारवाडी जिल्हा परिषद मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानात तालुक्यात प्रथम ,




किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) डॉक्टर राज्याच्या शालेय शिक्षण विभागाच्या बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजने अंतर्गत मुख्यमंत्री माजी शाळा सुंदर शाळा हे अभियान राज्यभर राबवण्यात आले. त्याचे मूल्यांकन समितीने २९ फेब्रुवारी २०२४ रोजी मूल्यांकन केले आणि आठ विभागातील प्रत्येकी एक बाप्रमाणे शाळा निवडण्यात आल्या, यामध्ये सरकारी व खाजगी शाळांचे मूल्यांकन करण्यात आले. पोली वतीने राबविण्यात येत असलेल्या शैक्षणिक सत्र २०२३-२४ अंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानात किनवट तालुक्यातील सिंगारवाडी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेने तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकावत यश संपादन करत पालकांचा विश्वास सार्थ ठरवला. याचे सर्व श्रेय मुख्याध्यापक वैद्य सर व सर्व सहकारी शिक्षक यांच्यासह शालेय व्यबस्थापन समितीचे अध्यक्ष सदस्य गावकरी यांचे असल्याचे सांगितले. द्वितीय क्रमांक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सारखणी, तृतीय क्रमांक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तळ्याचीवाडी यांनी पटकावला. खाजगी व अनुदानित संस्थांमधून प्रथम क्रमांक महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक विद्यालय गोकुंदा यांनी प्रथम, बजरंग विद्यालय पाटोदा खुर्द द्वितीय क्रमांक, पोतदार इंग्लिश स्कूल बंदी या शाळेने तृतीय क्रमांक पटकावला. जिल्हा परिषदेच्या बन्याच दिवसापासून पतली. चालू शैक्षणिक सत्रात गेल्या १४ ते २० फेब्रुवारी २०२४ दरम्यान जिल्हा परिषद, शासकीय, खासगी अनुदानित शाळांचे मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमा उपक्रमांचे मुल्यमापन तालुका समिती मार्फत करण्यात येऊन स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला. सदरील अभियानाअंतर्गत तालुक्यातील सहभागी शाळांची केंद्र स्तरीय तपासणी आली होती. यात मूल्यमापन समि तीने शाळेची तपासणी करताना या अभियान अंतर्गत शाळेत शाळा इम प्रतीची रंगरंगोटी, निसर्गरम्य परिसर बॉलके वर्ग, बोलक्या भिती, बोलके छत, विद्यार्थ्यांसाठी भौतिक सुविधा, क्रीडा क्षेत्रातील विद्यार्थ्यांचा विशेष सहभाग, सांस्कृतिक क्षेत्रातील विद्यार्थ्यांचा सहभाग, स्वच्छता अभियान, शाळेचा विविध सामाजिक उपक्रमात असलेला सहभाग, शासनाने बेळोवेळी दिलेल्या उपक्रमात सहभाग, या असंख्य उपक्रम शाळेने यशस्वीपणे राबविल्या मुळे केंद्रस्तरीय, तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय मूल्यमापन समितीकडून राबवीत असलेल्या उपक्रम करण्यात ाबद्दल समाधान व्यक्त केले. तालुका म ल्यमापन समितीने आपला निकाल जाहीर केला. या निकालामुळे मुख्याध्यापक शिक्षक विद्यार्थी पालक शालेय व्यवस्थापन समिती यांचे अभिनंदन करत शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा. अभियानांतर्गत तालुकास्तरीय स्पर्धेत निवड झालेल्या शाळांना शासनाकडून सन्मानचिन्हे, प्रशस्तीपत्र, रोख रकम मिळणार आहे. प्रथम येणाऱ्या सिंगारबाडी येथील अंतर्गत राबविण्यात आलेल्या विविध प्राथमिक शाळेने

## संपादकीय....

# सुरक्षा कडक करण्याची गरज

कमलेश गिरी भारताची सिलिकॉन व्हॅली असणार्या बंगळूरमधील नामांकित रामेश्वरम कॅफेमध्ये अलीकडेच झालेल्या स्फोटामुळे देशभरात खळबळ उडाली आहे. या परिसरात आयबीएम, एसएपीसारख्या आयटी कंपन्या आणि स्टार्टअप कंपन्या आहेत. देशातील तंत्रज्ञानाचे हे केंद्र आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांना व्यवसाय करण्याची ही लोकप्रिय जागा आहे. स्फोटामुळे बंगळूरसारख्या टेकसिटी राष्ट्रविघातक शक्तींच्या हिटलिस्टवर असल्याचे दिसते.कर्नाटकच्या विधानसभेत पाकिस्तान जिंदाबादच्या घोषणा दिल्याने राज्यातील वातावरण तापलेले असतानाच १ मार्च रोजी दुपारी एकच्या सुमारास भारताची सिलिकॉन व्हॅली बंगळूरमधील नामांकित रामेश्वरम कॅफे स्फोटाने हादरले. आयटी हब असलेल्या भागात स्फोट झाला. याठिकाणी आयटीत काम करणार्या युवकांची वर्दळ असते. या स्फोटामुळे आग लागली नाही; मात्र कॅफेतील वॉशबेसिन असलेल्या भागात प्रचंड धूर पसरला. तेथे खिळे आणि नट-बोल्ट विखुरलेल्या स्थितीत आढळून आले. बंगळूरमधील या कॅफेत नेहमीच गर्दी असते.या स्फोटात नऊ जण जखमी झाले. बंगळूरमधील एका कॅफेमध्ये झालेल्या बॉम्बस्फोटाने सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्याची गरज पुन्हा अधोरेखित झाली आहे. या घटनेनंतर प्रशासन तत्काळ सक्रिय झाले आणि गुन्हेगाराला पकडण्यासाठी सापळा रचला. सुदैवाने हे स्फोटक सौम्य तीव्रतेचे असल्याने जास्त नुकसान झाले नाही. शुक्रवारी दुपारी एक तरुण बॅग घेऊन कॅफेमध्ये घुसला आणि जेवणाची ऑर्डर दिल्यानंतर बॅग तिथेच टाकून निघून गेल्याची माहिती आहे. त्यानंतर काही वेळातच स्फोट झाला. त्या तरुणाचे छायाचित्र सीसीटीव्ही कॅमेर्यात कैद झाले आहे. या घटनेला दहशतवादी कारस्थान मानण्यास पोलीस अजूनही नकार देत आहेत. बेकायदेशीर कृती कायद्यांतर्गत एफआयआर दाखल करण्यात आला आहे.नोव्हेंबर २०२२ मध्ये मंगळूर येथील स्फोटानंतर तपास आणि शोध पथकाने अनेक धक्कादायक खुलासे केले होते. आताच्या स्फोटानंतर तपास यंत्रणांनी अनेक बाजूंनी तपास सुरू केला आहे. यामध्ये शहरातील हॉटेल, रेस्टॉरंट आणि लोकप्रिय ठिकाणी सुरक्षेत अनेक उणिवा दिसून आल्या. त्याचवेळी अशा प्रकारची ठिकाणे ही दहशतवाद्यांसाठी 'सॉफ्ट टार्गेट' असतात. या तपास कामात सुमारे ८ पथके काम करत आहेत. मंगळूर येथे नोव्हेंबर २०२२ मध्ये एका ऑटो रिक्षात एक व्यक्ती प्रेशर कुकरमध्ये आयईडी स्फोटके लपवून नेत होती; मात्र वाटेत स्फोट झाला. या स्फोटाचा सखोल तपास केला असता आयईडी स्फोटके ही कादरी मंजुनाथ मंदिर येथे नेण्यात येणार असल्याचे निष्पन्न झाले.तपासकर्त्यांच्या मते, मंगळूर येथील प्रेशर कुकर स्फोट हा इसिसने घडवून आणला आणि यात लष्कर-ए-तय्यबाच्या एका दहशतवाद्याचा समावेश होता.रामेश्वरम कॅफेतील स्फोट हा झोप उडवणारा आहे; कारण बंगळूर ही कर्नाटकची राजधानी आहे आणि अनेक देशी आणि विदेशी सॉफ्टवेअर कंपन्या आणि शैक्षणिक संस्थांचे मुख्यालयही येथे आहे. या परिसरात आयबीएम, एसएपीसारख्या आयटी कंपन्या आणि स्टार्टअप कंपन्या आहेत. देशातील तंत्रज्ञानाचे हे केंद्र आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांना व्यवसाय करण्याची ही लोकप्रिय जागा आहे. हा कॅफे आहारासाठी आणि खाद्यपदार्थांसाठी प्रसिद्ध आहे. तेथे अनेक उद्योजक, तरुण इंजिनिअर नियमितपणे दुपारचे भोजन करतात. नेमकी हीच वेळ साधून स्फोट घडवून आणला.व्यापारी शहरात अशा स्फोटांच्या घटनांमुळे तेथील व्यावसायिकांच्या मनोधैर्यावर विपरीत परिणाम होतो. विशेषतः परदेशी कंपन्या अशा असुरक्षित ठिकाणी आपला व्यवसाय चालवणे योग्य मानत नाहीत. त्यामुळेच हा स्फोट कर्नाटक सरकारसाठी आव्हान बनला आहे. या स्फोटानंतर बंगळूरच्या हॉटेलमालकांनी हॉटेलच्या प्रवेशद्वारावर मेटल डिटेक्टर बसविण्याचा निर्णय घेतला. तसेच मेटल डिटेक्टरमध्ये स्फोटके स्कॅन झाल्यास सायरन वाजवणारे तंत्रदेखील काहींनी बसविले आहे. आपली तपास यंत्रणा पुरेशी सक्षम आहे. त्यामुळे हळूहळू का होईना, परंतु या स्फोटाचे धागेदोरे शोधले जात आहेत. त्यांना सर्वांनी सहकार्य केले पाहिजे.

# भारतीय भाषासंवर्धक भारतीय संस्था!

साहित्य अकादमी ही एक भारतीय भाषांचे संवर्धन करणारी भारतीय संस्था आहे. या संस्थेची स्थापना दि.१२ मार्च १९५४ रोजी झाली. या संस्थेला सरकारी अनुदान असले तरी स्वरूप स्वायत्त आहे. साहित्य अकादमी ही साहित्याच्या क्षेत्रात वेगवेगळे उपक्रम राबवत असते. या अंतर्गत संशोधन, तसेच लेखकांसाठी प्रवास अशा उपक्रमांसाठी अर्थपुरवठा करते. तसेच साहित्य अकादमी पुस्तके व समकालीन भारतीय साहित्य हे हिंदी भाषा भाषेतील नियतकालिक ही प्रकाशित करते. भारतीय साहित्याचा विश्वकोशही साहित्य अकादमी ने प्रकाशित केला आहे. साहित्य अकदामीचे बहुभाषिक व अतिशय समृद्ध असे भारतातील एक प्रमुख ग्रंथालय आहे. भारतीय भाषा साहित्य अकॅडमीने २४ भाषांना मान्यता दिली आहे.

ही भारतीय साहित्यविषयक विविध उपक्रम व कार्ये अमलात आणणारी, भारतातील राष्ट्रीय पातळीवरची प्रमुख साहित्यसंस्था आहे. दि.१२ मार्च १९५४ रोजी नवी दिल्ली येथे ही साहित्यसंस्था स्थापन झाली. ही केंद्र शासनाच्या अखत्यारीखालील स्वायत्त स्वरूपाची संस्था असून तिला भारत सरकारच्या सांस्कृतिक खात्यातर्फे पूर्णतः आर्थिक अनुदान दिले जाते. १९५६ मध्ये साहित्यसंस्था म्हणून तिची अधिकृत नोंदणी झाली. भूतपूर्व पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरु हे या संस्थेचे पहिले अध्यक्ष होते. या अकादेमीचे प्रमुख कार्य भारतातील साहित्यविषयक पूर्वसंचिताचे जतन करून, नवीन स्वतंत्र तसेच अनुवादित वाङ्‌मयाच्या निर्मितीला प्रोत्साहन देणे, हे आहे. अकादेमी विविध प्रादेशिक भाषांतील लेखकांना उत्तेजनार्थ पारितोषिके व मानचिन्हे देऊन गौरवीत असते. प्रकाशने, अनुवाद, परिसंवाद, कार्यशाळा, देशाच्या विविध भागांत साहित्यमेळाव्यांचे आयोजन, लेखकांच्या वाचकांशी भेटी घडवून आणणे, असे नानाविध प्रकारचे उपक्रम राबवून त्यांद्वारे भारतीय साहित्याच्या अभिवृद्धीस व विकासास चालना देणे, हे या संस्थेचे उद्दिष्टानुसारी प्रमुख कार्यक्षेत्र आहे. अकादेमीच्या वतीने प्रकाशनांचा विस्तृत व विविधस्वरूपी कार्यक्रम राबविला जातो. भारतीय भाषांतील समकालीन वाङ्‌मयाची सूची तयार करणे, समकालीन लेखकांच्या उत्कृष्ट व निवडक साहित्यकृतींचे संग्रह प्रकाशित करणे, आधुनिक भारतीय भाषांतील वाङ्‌मयाचा इतिहास व विकास यांचा विस्तृत आढावा घेणारे प्रमाणभूत ग्रंथ इंग्रजी व हिंदी भाषांत तयार करून घेऊन ते प्रकाशित करणे, प्राचीन संस्कृत महाकाव्ये व पुराणे यांच्या सटीप आवृत्त्या प्रसिद्ध करणे इ.अनेक योजना व उपक्रम अकादेमीने आजपावेतो राबविले आहेत. भारतीय भाषांचे इतिहास प्रकाशित करून भारतातील प्रमुख भाषांच्या विकासाला उत्तेजन देणे व त्यांना जास्तीत जास्त परस्परांच्या सान्निध्यात आणणे, हे उद्दिष्ट अकादेमीने साध्य केले आहे. आपल्या देशातील विविध भाषांचा परिचय सर्वांना असणे शक्य नाही; परंतु भारतातील प्रत्येक सुशिक्षित व्यक्तीने आपल्या भाषेतील ज्ञानाबरोबरच इतर भाषांतील साहित्याची माहिती करून घेण्याची इच्छा ठेवली पाहिजे. इतर भाषांत लिहिलेल्या ग्रंथांचा, तसेच प्रसिद्ध पुस्तकांचा परिचय करून घेतला पाहिजे व या प्रकारे आपल्या व्यक्तिमत्त्वात भारतीय संस्कृतीचा विशाल व उदार दृष्टिकोण आणि बहुभाषिक प्रेरणा वृद्धिंगत केली पाहिजे, पं.नेहरुंच्या या उद्गारांमध्ये साहित्य अकादेमीच्या कार्याची उद्दिष्टे नेमकेपणाने प्रतिबिंबित झाली आहेत. या प्रक्रियेला मदत म्हणून साहित्य अकादेमीने भारतातील प्रादेशिक भाषांमधील प्रसिद्ध पुस्तकांचे इतर प्रादेशिक भाषांमध्ये अनुवाद करण्याची व विविध भारतीय भाषांचे इतिहास प्रसिद्ध करण्याची योजना कार्यान्वित केली आहे. अकादेमीच्या या प्रयत्नांमुळे आपल्या मातृभाषेतून अन्य विविध भारतीय भाषांतील साहित्याचा आस्वाद घेणाऱ्या वाचकांच्या साहित्यिक- सांस्कृतिक ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्याचे, त्या अधिक सखोल करण्याचे आणि भारतीय विचार व साहित्य यांच्यामागील एकात्म पार्श्वभूमीचे त्यांचे भान जागृत करण्याचे अकादेमीचे उद्दिष्ट बव्हंशी साध्य झाले आहे.

आपल्या विविधस्वरूपी उपक्रमांची कार्यप्रणाली व पद्धती निश्चित करण्यासाठी अकादेमीने लिखित संविधान तयार केले असून त्यातील मार्गदर्शक तत्त्वांनुसार अकादेमीचे कार्य चालते. अकादेमीने एकूण चोवीस प्रादेशिक भारतीय भाषांना अधिकृत मान्यता दिलेली आहे. त्या प्रत्येक प्रादेशिक भाषेतील एकूण दहा सदस्यांचे सल्लागार मंडळ अकादेमीमार्फत स्थापले जाते व त्या त्या प्रादेशिक भाषेतील अकादेमीकृत कार्याचे आयोजन व सुसूत्रीकरण या सल्लागार मंडळामार्फत केले जाते. संबंधित भाषेतील वेगवेगळे उपक्रम, पुरस्कार, अनुवादयोजना राबविण्यासाठी ग्रंथनिवड इ.अनेक बाबतींत हे सल्लागार मंडळ अकादेमीला सल्ला देत असते व त्यानुसार अकादेमी कार्यवाही करते. पूर्व, पश्चिम, उत्तर व दक्षिण या चार प्रादेशिक विभागांसाठी वेगवेगळी चार प्रादेशिक विभागीय कार्यालये अकादेमीने स्थापन केली आहेत व त्या त्या प्रादेशिक विभागांतील भाषांमध्ये परस्पर आदान-प्रदान घडवून आणणे, हे या विभागीय कार्यालयांचे प्रमुख उद्दिष्ट आहे. नवी दिल्ली येथे अकादेमीचे मुख्य मध्यवर्ती कार्यालय असून कोलकाता, मुंबई, बंगलोर व चेन्नई येथे प्रादेशिक विभागीय कार्यालये आहेत. अकादेमीचे चार भाषांतर-विभाग असून ते बंगलोर, दिल्ली, अहमदाबाद व कोलकाता येथे आहेत. बडोदे येथे अकादेमीचे प्रकल्प कार्यालय असून तेथे मौखिक तसेच आदिवासी साहित्याचे जतन व विकासाचे कार्य चालते. भारतीय भाषांतील साहित्याचे अभिलेखागारही तेथे आहे. नवी दिल्ली येथील मुख्य कार्यालयात तसेच बंगलोर व कोलकाता येथील विभागीय कार्यालयांत बहुभाषिक ग्रंथांचा विपुल, प्रचंड व मौलिक साठा असलेली वैशिष्ट्यपूर्ण व समृद्ध ग्रंथालये आहेत. चोवीस प्रादेशिक भाषांतील सुमारे दीड लाख ग्रंथ हे या संग्रहालयाचे लक्षणीय वैशिष्ट्य होय.

साहित्य अकादेमी प्रतिवर्षी मान्यताप्राप्त चोवीस प्रादेशिक भाषांतील सर्वोत्कृष्ट सर्जनशील साहित्यकृतींसाठी चोवीस पुरस्कार व अनुवादित ग्रंथांसाठी चोवीस पुरस्कार देत असते. इंग्रजी भाषिक ग्रंथांसाठीही पुरस्कार ठेवले आहेत. स्वतंत्र साहित्यकृतीसाठी रु.एक लाख आणि मानचिन्ह व अनुवादित कृतीसाठी रु.पंचवीस हजार आणि मानचिन्ह असे या पुरस्कारांचे स्वरूप आहे. शिवाय साहित्यातील मौलिक योगदानाबद्दल साहित्यिकांना विशेष गौरववृत्ती दिली जाते. या संदर्भात मराठी साहित्यातील विशेष उल्लेखनीय दोन घटना म्हणजे, साहित्य अकादेमीने सर्वोत्कृष्ट भारतीय ग्रंथांना पुरस्कार देण्याची योजना १९५५पासून सुरू केली. त्या योजनेतील पहिला मराठी पुरस्कार तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या वैदिक संस्कृतीचा विकास या ग्रंथाला लाभला, तसेच साहित्य अकादेमीने २००४मधील सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त जाहीर केलेल्या पहिल्या विशेष जीवनगौरव पुरस्काराचे मानकरी श्रेष्ठ दलित कवी नामदेव ढसाळ हे ठरले. साहित्य अकादेमीमार्फत भाषा सम्मान हा पुरस्कार प्रादेशिक भाषांच्या विकासकार्यार्थ दिला जातो. दक्षिण आशियाई भाषांतील विद्वानांना आनंद कुमारस्वामी पुरस्कार देण्यात येतो. भारतीय साहित्याच्या संदर्भात विशेष मौलिक कार्य करणाऱ्या परकीय विद्वानांना सन्मान्य गौरववृत्ती दिली जाते. साहित्य अकादेमी एकूण चोवीस प्रादेशिक भाषांत व इंग्रजी भाषेतही पुस्तके प्रकाशित करते. या योजनेंतर्गत भारतीय भाषांतील पारितोषिकप्राप्त पुस्तकांचे अनुवाद, भारतीय साहित्यातील सर्व प्रादेशिक भाषांतील श्रेष्ठ आणि युगप्रवर्तक साहित्यिकांवर, त्यांचे जीवन व वाङ्‌मयीन कार्यांचा परिचय करून देणाऱ्या व्याप्तिलेखवजा प्रबंधिका, भारतीय प्रादेशिक भाषांचे वाङ्‌मयेतिहास, भारतीय तसेच विश्वसाहित्यातील श्रेष्ठ, अभिजात साहित्यकृतींची प्रादेशिक भाषांत भाषांतरे, निवडक ललित साहित्यकृतींची उदा. कथा, कविता, निबंध इ. संकलने, चरित्रे, भारतीय साहित्यिकांचे अल्पपरिचयात्मक कोश, अनुवाद-सूची, भारतीय साहित्यकोश इ.विविध प्रकारची पुस्तके अकादेमीने प्रकाशित केली आहेत. या वेगवेगळ्या प्रकारांत अकादेमीने सुमारे ४ हजार पुस्तके प्रकाशित केली आहेत. विशेष संदर्भमूल्य असलेल्या, अकादेमीमार्फत प्रकाशित काही महत्त्वाच्या ग्रंथांचा उदाहरणादाखल निर्देश करता येईल- एन्सायक्लोपीडिया ऑफ इंडियन लिटरेचर पाच खंड- १९८७-९२ हा भारतीय साहित्यकोश; नॅशनल बिब्लिऑग्रफी ऑफ इंडियन लिटरेचर- चार खंड: १९०१-५३ ही राष्ट्रीय ग्रंथसूची; निरनिराळ्या प्रादेशिक भाषांतील विद्यमान लेखकांचा अल्पपरिचय करून देणारा हूज हू ऑफ इंडियन रायटर्स- दोन खंड: १९९९; डॉ.सुकुमार सेनकृत हिस्टरी ऑफ बेंगॉली लिटरेचर- १९६० यांसारखे भारतातील प्रादेशिक भाषांतील साहित्याचे इंग्रजी, हिंदी भाषांतील इतिहास; मेन ऑफ लेटर्स तसेच मेकर्स ऑफ इंडियन लिटरेचर अशा ग्रंथमालांतर्गत भारतीय साहित्याच्या इतिहासातील महत्त्वाच्या टप्प्यांवरील युगप्रवर्तक अशा प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन साहित्यिकांचे जीवन व वाङ्‌मय यांचा परिचय करून देणारी इंग्रजी पुस्तकांची मालिका, याशिवाय साहित्य अकादेमीतर्फे इंडियन लिटरेचर- इंग्रजी भाषेतील द्वैमासिक, समकालीन भारतीय साहित्य- हिंदी भाषेतील द्वैमासिक व संस्कृत प्रतिभा- संस्कृत भाषेतील अर्धवार्षिक ही तीन नियतकालिके प्रकाशित केली जातात. वाङ्‌मयेतिहास, सौंदर्यशास्त्र तसेच विविध वाङ्‌मयीन विषयांवर अकादेमीमार्फत प्रतिवर्षी सुमारे तीस चर्चासत्रे प्रादेशिक, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरांवरही आयोजित केली जातात. त्याचप्रमाणे अनेक प्रकारच्या कार्यक्रम मालिकाही योजिल्या जातात. उदा.मीट द ऑथर, कविसंधी, कथासंधी, अस्मिता, मुलाकात, मेन अँड बुक्स, थ्रू माय विंडो, लोक, द मेनी व्हॉइसेस, आविष्कार, अंतराल, लिटररी फोरम अशा विविध वाङ्‌मयीन कार्यक्रमांचे हिंदी, इंग्रजी भाषांत आयोजन केले जाते. याशिवाय अकादेमी नियमितपणे अनुवाद-कार्यशाळाही भरवते.

अकादेमी दर वर्षी साधारण फेब्रुवारी महिन्यात साहित्य-महोत्सव सप्ताह आयोजित करते. या आठवडाभरात काही विशिष्ट विषयांवर प्रकल्प योजिले जातात. उदा.प्राचीन भारतीय साहित्य, मध्ययुगीन भारतीय साहित्य, आधुनिक भारतीय साहित्य यांसारखे विषय या प्रकल्पांत चर्चिले जातात. याबरोबरच अकादेमीने गेल्या सुमारे पाच सहस्रकांच्या कालावधीतील उत्कृष्ट निवडक भारतीय साहित्यकृतींचे संकलन एकूण दहा खंडांत प्रकाशित केले आहे. भारताच्या वेगवेगळ्या भागांतील आदिवासींच्या साहित्याचे भाषांतर व प्रकाशन हा अकादेमीने हाती घेतलेला आणखी एक महत्त्वपूर्ण प्रकल्प होय. बडोदे येथील अकादेमीच्या कार्यालयात तो कार्यान्वित करण्यात आला आहे. ह्या प्रकल्पांतर्गत पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत. अकादेमीने नॅशनल बुक ट्रस्टच्या सहकार्याने एक संयुक्त प्रकल्प राबविला असून त्याअंतर्गत शंभर भारतीय अभिजात साहित्यकृतींच्या भाषांतराची महत्त्वाकांक्षी योजना हाती घेण्यात आली आहे. भारतीय साहित्याच्या अभिलेखागाराची योजना हा अकादेमीचा आणखी एक महत्त्वपूर्ण प्रकल्प होय. या प्रकल्पांतर्गत चित्रफिती, दृक्ध्वनिफिती, श्रवणफिती, सीडी आदी तांत्रिक साधनांद्वारे भारतातील दुर्मीळ व मौलिक साहित्यधनाचे जतन व दस्तऐवजीकरण तसेच श्रेष्ठ भारतीय साहित्यिकांची मूळ हस्तलिखिते, छायाचित्रे इ. सामग्री जतन करणे, अशा काही योजना राबविल्या जात आहेत. अकादेमीच्या वतीने निरनिराळ्या राज्यांतील गुणी, तरुण लेखकांना प्रवासशिष्यवृत्ती दिली जाते. त्यांनी भारतातील अन्य राज्यांमध्ये जाऊन तेथील लेखकांच्या गाठीभेटी घेऊन त्यांच्याशी संवाद साधावा, तसेच तेथील प्रादेशिक साहित्य-संस्कृतीचा परिचय करून घ्यावा, या उद्देशाने अशा शिष्यवृत्त्या दिल्या जातात. अकादेमीच्या सांस्कृतिक देवाण-घेवाण योजनेच्या अंतर्गत भिन्न भिन्न प्रदेशांतील- भाषांतील लेखकांनी परस्परांचे साहित्य अनुवादित व प्रकाशित करणे, तसेच दोन भिन्न भाषिक राज्यांमध्ये लेखक-विद्वानांची परस्पर आवक-जावक असे अनेकविध उपक्रम राबविले जातात. भारतातील सर्व राज्यांमधील प्रादेशिक भाषांमध्ये परस्परजवळीक साधावी, वाङ्‌मयीन आदान-प्रदान व्हावे, त्यायोगे साहित्यिक- सांस्कृतिक एकात्मतेची जाण वृद्धिंगत व्हावी आणि देशाच्या सांस्कृतिक व भावनात्मक ऐक्यास हातभार लावावा, ही अकादेमीची भूमिका या सर्व प्रकल्प-उपक्रमांमागे कार्यरत आहे.

साहित्य अकादमी पुरस्कार हा साहित्य क्षेत्रातील एक सर्वोच्च सन्मान असून साहित्य अकादमी, नवी दिल्ली या संस्थेतर्फे दर वर्षी २४ भारतीय भाषांतील सर्वोत्तम साहित्यांसाठी दिला जातो. या पुरस्काराचे स्वरूप हे पुरस्काराचे मानचिन्ह, (जे स्वतः श्रेष्ठ दिग्दर्शक सत्यजित रे यांनी डिझाईन केले आहे.) आणि १ लाख रोख रक्कम असे आहे. साहित्य अकादमीची स्थापना ही १९५४ साली भारताच्या सांस्कृतिक खात्याने केली असून त्याचा उद्देश हा भारतात अभिजात साहित्याचा प्रचार करणे हा आहे. त्याचाच एक भाग म्हणून हा साहित्य अकादमी पुरस्कार दरवर्षी दिला जातो. या पुरस्काराच्या नामांकनाची प्रक्रिया ही वर्षभर सुरू असते. यामध्ये सर्वात आधी प्रत्येक भाषेतील तज्ञ व्यक्तींची समिती नेमली जाते, ज्यातून त्या त्या भाषेतील ५ उत्कृष्ट पुस्तकांची निवड केली जाते. जी पुढे प्राथमिक समितीपुढे मांडली जाते. या समितीतून ज्या ज्या पुस्तकांच्या नावाची शिफारस होईल त्या पुस्तकांचा ३ पंचांकडून परत विचार केला जातो आणि शेवटचा निर्णय होऊन हा पुरस्कार जाहीर होतो. या पुरस्काराचे निकष म्हणजे साहित्य हे अभिजातच हवे, ज्यातून त्या भाषेचा आणि संस्कृतीचा प्रचार होईल. तसेच एकदा साहित्य अकादमी मिळालेल्या लेखकाचा परत विचार केला जात नाही. अपूर्ण साहित्य, संशोधनपर ग्रंथ, दुसर्या साहित्याचा आधार घेऊन लिहिलेली पुस्तके, अनुवादित पुस्तके, एकापेक्षा जास्त लेखकांनी लिहिलेली पुस्तके, तसेच साहित्य अकादमी मंडळात काम करणार्या लेखकांची पुस्तके अशा साहित्यांना या पुरस्कारात स्थान नसते. तसेच लेखक किंवा प्रकाशक स्वतः स्वतःच्या पुस्तकाची शिफारस करू शकत नाही. तसेच एखाद्या मृत्यू पावलेल्या लेखकाच्या मृत्यूच्या पाच वर्षांपर्यंतच त्याच्या साहित्याची शिफारस करता येते. या सर्व निकषांवरच ही पुस्तके निवडली जातात. सन १९५५पासून हा पुरस्कार देण्यात येत आहे. !! राष्ट्रीय साहित्य अकादमी स्थापना दिनाच्या सप्ताहभर समस्त साहित्यिक बंधुभगिनींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

*********

- संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त मधुभाष- ७७७५०४१०८६.

# लोकशाहीला बळकटी

आमदार, खासदार पैसे घेऊन सभागृहात भाषण किंवा मत देत असल्यास आता त्यांना कायदेशीर संरक्षण मिळणार नाही, लोकप्रतिनिधी असले तरी त्यांच्यावर फौजदारी खटला दाखल केला जाऊ शकतो असा ऐतिहासिक निर्णय सुप्रीम कोर्टाच्या ७ न्यायमूर्तींच्या खंडपीठाने दिला आहे. गेल्या काही वर्षांमध्ये वाढत गेलेल्या राजकारणातील घोडेबाजाराला लगाम घालण्यासाठी उचललेले पाऊल म्हणून याकडे पहावे लागेल. लोकशाहीमध्ये जनता सार्वभौम असली तरी जनतेनेच नियुक्त केलेल्या लोकप्रतिनिधींना राज्यघटनेने विशेषाधिकार बहाल केलेले आहेत; परंतु ही विशेषाधिकारांची कवच-कुंडले घालून लोकशाहीच्या मूळ तत्त्वांची पायमल्ली करणारी कृत्ये काही लोकप्रतिनिधींकडून केली गेल्याचे मागील काळात दिसून आले आहे. 'नोट फॉर व्होट'सारखी प्रकरणे असोत किंवा आमदार-खासदारांचा घोडेबाजार असो यांमुळे जनतेचा भ्रमनिरास होण्याची वेळ समीप आली होती. अशा काळात आलेला हा निर्णय आशादायक म्हणावा लागेल.मदार, खासदार पैसे घेऊन सभागृहात भाषण किंवा मत देत असल्यास आता त्यांना कायदेशीर संरक्षण मिळणार नाही. लोकप्रतिनिधी असले तरी त्यांच्यावर फौजदारी खटला दाखल केला जाऊ शकतो, असा ऐतिहासिक निकाल सर्वोच्च न्यायालयाच्या सात सदस्यीय खंडपीठाने अलीकडेच एकमताने दिला आहे. या निर्णयाच्या माध्यमातून संसद आणि विधिमंडळातील लोकप्रतिनिधींना मिळालेली विशेषाधिकारांची कवच-कुंडले काढून घेतल्याचे मानले जात असले तरी मूलत: या निर्णयाचा मतितार्थ कायद्यापुढे सर्व जण समान आहेत, असा आहे. मुळामध्ये ज्यांनी देशातील भ्रष्टाचाराच्या विरोधात कायदे केले आणि ही विषवल्ली समूळ नष्ट करण्यासाठी युद्ध पुकारले, त्यांना या विशेषाधिकारांमुळे भ्रष्टाचार करण्याचा अप्रत्यक्ष अधिकार प्राप्त झालेला होता. हा पूर्णत: विरोधाभास होता. आतापर्यंत या विशेषाधिकारांच्या कवच-कुंडलांमुळे अनेक आमदार आणि खासदार भ्रष्टाचाराच्या आरोपांनंतर कायदेशीर कारवाईपासून बचावले आहेत. कारण राज्यघटनेच्या कलम १०५/१९४ मध्ये असे म्हटले आहे की लोकप्रतिनिधींच्या सभागृहात सांगितलेल्या किंवा केलेल्या कोणत्याही वर्तनावर कोणतीही कारवाई केली जाऊ शकत नाही. न्यायालयांनाही त्याविरोधात कारवाई करता येत नाही. पण हे कलम कोणत्याही एका लोकप्रतिनिधीच्या सुरक्षेसाठी नसून संपूर्ण सभागृहाच्या सुरक्षिततेसाठी बनवण्यात आले आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. तसेच या कलमांतर्गत मिळालेल्या सुरक्षाकवचाची झूल पांघरून लोकशाहीच्या मूल्यांना तिलांजली देणारे वर्तन केले जात असेल तर ते खपवून घेतले जाणार नाही, असाही संदेश सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिला आहे. यासंदर्भात २५ वर्षांपूर्वी पाच सदस्यांच्या पीठाने बहुमताने दिलेला निर्णय रद्द ठरविला आहे आणि लाचखोरी किंवा भ्रष्टाचाराच्या आरोपांमधून लोकप्रतिनिधीस विशेषाधिकाराची कवच-कुंडले बहाल करण्यास स्पष्ट नकार दिला आहे.ज्या प्रकरणावर सुनावणी करताना हा ऐतिहासिक निकाल देण्यात आला तो खटला प्रत्यक्षात झारखंड मुक्ती मोर्चाच्या एका नेत्याशी संबंधित होता. २०१२ मध्ये झालेल्या राज्यसभा निवडणुकीच्या वेळी झारखंड मुक्ती मोर्चाचे प्रमुख शिबू सोरेन यांची सून आणि पक्षाच्या (झामुमो) आमदार सीता सोरेन यांनी एका अपक्ष उमेदवाराकडून मतासाठी लाच स्वीकारल्याचा आरोप झाला होता. या आरोपामुळे सबंध देशभरात प्रचंड खळबळ उडाली होती. हा आरोप रद्द करण्यासाठी त्यांनी झारखंड उच्च न्यायालयात धाव घेतली. मात्र १७ फेब्रुवारी २०१४ रोजी न्यायालयाने ही याचिका फेटाळण्यात आली. त्यामुळे सीता सोरेने यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आणि १९९८ च्या निकालानुसार आपले सासरे शिबू सोरेन यांना मिळालेले संरक्षण आपल्यालाही मिळावे, अशी मागणी केली. २०१९ मध्ये तत्कालीन सरन्यायाधीश रंजन गोगोई यांच्यासमोर ही याचिका सुनावणीस आली होती. पुढे २० सप्टेंबर २०२३ रोजी १९९८ च्या निकालाचा फेरविचार करण्यास मान्यता देण्यात आली. आता हा निकालच रद्दबातल ठरवण्यात आला आहे.१९९३ मध्ये तत्कालीन पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांच्या नेतृत्वाखालील सरकारवर विरोधकांनी अविश्वास ठराव आणला होता. देशाच्या राजकीय इतिहासामध्ये ही घटना महत्त्वाची ठरण्याचे कारण म्हणजे या ठरावाच्या विरोधात मतदान करण्यासाठी झारखंड मुक्ती मोर्चाच्या ५ नेत्यांनी लाच स्वीकारल्याचा आरोप झाला होता. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले असताना १९९८ मध्ये सभागृहातील वर्तनासाठी सदस्यांना कायद्याचे संरक्षण असल्याचा निर्वाळा बहुमताने देण्यात आला. कलम १०५ आणि १९४ अंतर्गत खासदार किंवा आमदाराला गुन्हेगारी न्यायालयामध्ये लाचखोरीच्या आरोपासाठी खटला चालवण्यापासून संरक्षण असल्याचा दावा करता येतो का याबद्दल विचार करण्यात आल्याचे न्यायालयाने म्हटले होते. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने १९९८ चा निकाल रद्द ठरवला. झारखंड मुक्ती मोर्चा लाचखोरी प्रकरणात



सर्वोच्च न्यायालयाचे आकलन कलम १०५ आणि १९४ यांच्याशी विसंगत होते, असे निरीक्षण खंडपीठाने नोंदवले आहे. या कलमांचा हेतू चर्चा, सभागृहातील वैचारिक देवाण-घेवाण करण्यासाठी असल्याने एखादा सदस्य लाचखोरी करून मतदान किंवा भाषण करतो तेव्हा तो हेतूच नष्ट होत असल्याचे न्यायालयाने नमूद केले आहे.ताजा निर्णय हा लोकशाहीच्या शुद्धीकरणासाठीचे आवश्यक पाऊल म्हणून पाहिला गेला पाहिजे. लोकशाहीमध्ये जनता सार्वभौम असली तरी भारतीय राज्यघटनेने जनतेनेच नियुक्त केलेल्या लोकप्रतिनिधींना विशेषाधिकार बहाल केलेले आहेत; परंतु ही विशेषाधिकारांची कवच-कुंडले घालून बेकायदेशीर आणि लोकशाहीच्या मूळ तत्त्वांची पायमल्ली करणारी कृत्ये काही लोकप्रतिनिधींकडून केली गेल्याचे मागील काळात दिसून आले आहे. 'नोट फॉर व्होट'सारखी प्रकरणे असोत किंवा आमदार-खासदारांचा घोडेबाजार असो यांसारख्या प्रकरणांमुळे जनतेचा भ्रमनिरास होण्याची वेळ समीप आली होती. अशा काळात आलेला हा निर्णय आशादायक म्हणावा लागेल.पक्षांतरविरोधी कायद्याला बगल देऊन सरकार पाडण्याच्या आणि आमदारांनी दुस-या पक्षाच्या सरकारमध्ये सामील होण्याच्या घटना गेल्या काही वर्षांत वाढल्या असताना, राज्यसभा-विधान परिषदांच्या निवडणुकीत लाच घेणे आणि दुस-या पक्षाच्या उमेदवाराच्या बाजूने मतदान करणे अशा घटनांमध्ये वाढ झालेली असताना आलेला हा निर्णय लाचखोरी करणा-या लोकप्रतिनिधींना वेसण घालणारा आहे.

# लठ्ठपणाच्या विळख्यात भारत

लॅंद लॅन्सेट'ने एक अहवाल नुकताच प्रसिद्ध केला आहे. ज्यामध्ये आपला भारत देश हा लठ्ठपणाच्या विळख्यात अडकत चालल्याचे नमूद करण्यात आले आहे. खासकरून तरुणांमध्ये याचे प्रमाण सर्वाधिक आहे. त्यामुळे येत्या काळात भारत लठ्ठपणा आणि त्यामुळे होणा–या विविध आजारांनी ग्रासलेल्या लोकसंख्येचा देश होण्याची भीती या अहवालात व्यक्त करण्यात आली आहे. लठ्ठपणा किंवा स्थूलपणा हा कधीही एकटा येत नाही. तो सोबत मधुमेह, हृदयविकार, उच्च रक्तदाब यांसारख्या व्याधींना घेऊन येतो. आज भारत ही मधुमेहाची राजधानी बनला आहे. उद्याचे भविष्य आनंददायी होण्यासाठी आजच लठ्ठपणाबाबत जागे होण्याची वेळ आली आहे.न्सेट हे जगातील सर्वात लोकप्रिय आणि सर्वात मान्यताप्राप्त वैद्यकीय नियतकालिक मानले जाते. जगभरातील आरोग्य समस्यांविषयी, आरोग्यविषयक स्थितीविषयी, नवीन संशोधनांविषयी या नियतकालिकाने सादर केलेले अहवाल हे महत्त्वाचे मानले जातात. अलिकडेच लॅन्सेटने एक अहवाल प्रकाशित केला जात असून त्यामध्ये जगभरात वाढत चाललेल्या लठ्ठपणाबाबत चिंता व्यक्त करण्यात आली आहे. जगातील एकूण लठ्ठ व्यक्तंची संख्या या नियतकालिकाच्या आकडेवारीवरून समोर आली असून त्यानुसार जगभरात मुले व प्रौढांमध्ये १९९० च्या तुलनेत २०२२ मध्ये लठ्ठपणाचे प्रमाण जवळजवळ चौपट झाल्याचे दिसून आले आहे. आपल्यासाठी चिंतेची बाब म्हणजे भारतातही स्थूलपणाची समस्या झपाट्याने वाढत आहे.देशभरात २०२२ मध्ये ५ ते १९ वयोगटातील सव्वा कोटी मुले लठ्ठ असल्याचे आढळून आले. त्यात ७३ लाख मुले आणि ५२ लाख मुलींचा समावेश होता. लठ्ठपणा असलेल्या मुलांच्या संख्येत १९९० पासून २०२२ पर्यंत ४० लाखांनी वाढ झाली आहे. मुलांमध्ये लठ्ठपणाचे प्रमाण ३ टक्के आढळून आले. प्रौढांमध्येही लठ्ठपणाच्या समस्येने गंभीर रूप धारण केले आहे. विशेषत महिलांमध्ये हे प्रमाण वाढत असून, ते ९.८ टक्के आहे. तसेच ५.४ टक्के पुरुषांमध्ये लठ्ठपणा आढळून येत आहे. महिलांमध्ये लठ्ठपणा आढळून येणा–या १९७ देशांपैकी भारत १८२ व्या स्थानी असून, पुरुषांचा विचार करता १८० व्या स्थानी आणि मुले आणि मुलींच्या बाबतीत १७४ व्या स्थानी आहे.मध्यंतरी प्रकाशित झालेल्या वर्ल्ड ओबेसिटी फेडरेशनच्या अहवालातही जीवनशैली, खाण्याच्या सवयी बदलल्या नाहीत तर २०३५ पर्यंत जगातील निम्म्याहून अधिक लोक लठ्ठ होतील, अशी भीती व्यक्त करण्यात आली होती. जगभरात वाढत चाललेल्या लठ्ठपणाच्या संख्येचा खुलासा ज्या जागतिक आरोग्य संस्था आणि इंपिरियल कॉलेज लंडनच्या लान्सेट रिपोर्टमध्ये केला आहे, तो अहवाल ३३ वर्षांची माहिती गोळा करून तयार करण्यात आला आहे. त्यानुसार २०२२ मध्ये जगभरात लठ्ठ व्यक्तींची संख्या ही ८८ कोटी झाली आहे. यामध्ये ५० कोटी ४० लाख महिला, ३७ कोटी ४० लाख पुरूष समाविष्ट आहेत. तर साधारण यावर्षी १५ कोटी ९० लाख मुलांचा समावेश आहे. लठ्ठपणा या समस्येवर जगभरातील १९० देशांचा हा अभ्यास समाविष्ट करण्यात आला आहेत. यामध्ये २२ कोटी लोकांच्या वजन आणि उंचीची माहिती गोळा करण्यात आली आहे. यामध्ये ६ कोटी ३० लाख हे ५ ते १९ वर्षीय मुलांचा समावेश असून १५ कोटी ८० लाख हे २० वर्षांपेक्षा अधिक वयांची मुलं आहेत.यानिमित्ताने दोन घटनांची आठवण करुन द्यावीशी वाटते. १९४२ साली अमेरिकेमध्ये दुस–या महायुद्धातील परिस्थितीचा सामना करण्यासाठी लठ्ठ लोकांवर टॅक्स लावावा आणि तो टॅक्स सर्वसामान्य वजनापेक्षा किती जास्त वजन आहे यावर आकारलेला असावा अशी सूचना डॉ. ए. जे. कार्लसन यांनी केली होती. ती तत्वत: सर्वांना मान्य होती. परंतु तिची अंमलबजावणी करणे किती अवघड आहे हे अनेकांनी समजून सांगितले. त्यामुळे हा प्रस्ताव मागे पडला. परंतु पुढे अमेरिकेत आणि काही युरोपीय देशांमध्ये एका वेगळ्या पद्धतीने लठ्ठपणावर कर लावण्यात आला. ती पद्धत म्हणजे लठ्ठ माणसावर कर लावण्याऐवजी लठ्ठपणा वाढवणा–या खाद्यपदार्थांवरचा कर वाढवणे. भारतातसुध्दा हा प्रश्न हळूहळू पुढे येऊ लागला आणि त्याचा विचार करून काही वर्षांपूर्वी केरळ सरकारने लठ्ठपणा वाढवणा–या जंक फूडवर १४.५ टक्के एवढा भक्कम कर लावला होता. केरळमध्ये ही कल्पना तिथे नव्याने सत्तेवर



आलेल्या डाव्या आघाडीच्या सरकारने राबवली होती. यापुढच्या काळामध्ये भारतात लठ्ठपणा ही फार मोठी समस्या होणार आहे आणि तिच्यातून मार्ग काढण्यासाठी सरकारला काहीतरी करावे लागणार आहे हे या केरळ सरकारच्या करातून सूचित झाले होते. वास्तविक तेव्हा ही कल्पना सरकारने राबवलेल्या एका उपक्रमातून पुढे आली होती.मध्यावधी अर्थसंकल्प मांडण्यापूर्वी लोकांकडूनकाही सूचना मागवल्या होत्या आणि सरकारचे करविषयक धोरण काय असावे हे सुचवण्याचे आवाहन केले. त्यातून आलेल्या सुचनांमधून या कराची संकल्पना मांडण्यात आली होती. अशा प्रकारची कर योजना फिनलंड, डेन्मार्क, मेक्सिको, जपान इत्यादी देशामध्ये करण्यात आलेली होती. त्यावरून एका नागरिकाने ही कल्पना केरळ सरकारला सुचवली होती. पण केरळ सरकारने तात्काळ तिची अमलबजावणी केली. कारण केरळमध्ये मधुमेहींची संख्या वाढत चालली होती. आज संपूर्ण भारतभर मधुमेहींची संख्या वाढत आहे. मधूमेह, हृदयविकार, रक्तदाब, ॲसिडीटी हे सगळे विकार वाढत्या राहणीमानातून आणि भोगवादी जीवनशैलीतून उद्भवतात. उत्पन्नाची साधने चांगलीच विकसित झाल्यामुळे लोकांचे शारीरिक कष्ट कमी झाले आहेत. त्याचाच परिणाम होऊन लठ्ठपणा वाढीस लागला आहे. आज भारत ही जगाची मधुमेहींची राजधानी ठरली आहे.लठ्ठपणाबाबत सर्वदूर चर्चा होण्याचे कारण म्हणजे यामुळे उद्भवणारे आजार. मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार यांबरोबरच विशीपंचवीशीतच गुडघे दुखणे, तिशीत किंवा पस्तिशीत कृत्रिम गुडघे बसवणे असे प्रकार लठ्ठपणामुळे दिसून येत आहेत. आपल्याकडे काही वर्षांपूर्वी पोट पुढे आलेल्या जाडजडू व्यक्तीकडे समृद्ध आयुष्य जगणारा माणूस म्हणून हेवा वाटून पाहिले जायचे; परंतु आधुनिक वैद्यकीय मोजमापांप्रमाणे शरारीतल चरबीचे प्रमाण अतिरिक्त असल्यास अशी व्यक्ती अचानक उद्भवणारे किंवा गंभीर आजार तसेच, ताणतणावाच्या परिस्थितीशी झुंज देण्यास असमर्थ ठरू शकते, ही बाब मांडली गेली आहे. आपल्या प्राचीन आरोग्यशास्त्रामध्ये समाविष्ट असणा–या आहारपद्धती, जीवनशैलीविषयक मांडणी आणि व्यायाम यांच्याद्वारे व्यक्ती सदृढ, निरोगी राहावी याबाबतचे मार्गदर्शन करण्यात आले आहे. परंतु बदलत्या जीवनचक्राने या सा–याचा विसर पडला आणि भौतिक सुखांच्या मागे धावण्याची स्पर्धा सुरू झाली. संगणकीकरणाचे युग आल्यामुळे आणि तंत्रज्ञानाची क्रांती झाल्यामुळे शारीरिक श्रमाची कामे आपसूकच कमी झाली.

# 'सबका साथ सबका विकास' हे उद्दिष्टही साध्य....

मराठवाडा रेल्वे कोच फॅक्टरीचा मा. प्रधान मंत्री यांचे शुभ हस्ते लोकार्पण सोहळा.मराठवाड्यासारख्या मागास भागामध्ये मोठे उद्योग यावेत या दृष्टीने माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या दूरदृष्टीतून देशातील चौथा आणि महाराष्ट्रातील पहिला रेल्वे बोगी निर्मिती कारखाना बनवण्याचा निर्णय झाला.


लातूरच्या विस्तारित औद्योगिक वसाहतीमध्ये ३५० एकर मध्ये भव्य दिव्य अशा मराठवाडा रेल्वे कोच बनवण्याचा कारखाना उभारण्यात आला. ज्यामधून दरवर्षी २५० वंदे भारत रेल्वेचे कोच तयार होणार आहेत. या कारखान्यामुळे लातूर जिल्ह्यातील युवकांच्या रोजगाराची स्वप्नपूर्ती होणार असून 'सबका साथ सबका विकास' हे उद्दिष्टही साध्य होतेय.या मराठवाडा रेल्वे कोच फॅक्टरीचा लोकार्पण सोहळा माझ्या सततच्या पाठपुराव्यामुळे दि. १२ मार्च २०२४ रोजी सकाळी ८ वाजता फॅक्टरीच्या आवारात माननीय प्रधानमंत्री श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या शुभहस्ते ऑनलाईन पद्धतीने आयोजित केलेला आहे.लातूर लोकसभेचा खासदार या नात्याने आदरणीय प्रधानमंत्री श्री. नरेंद्रजी मोदी, केंद्रीय गृहमंत्री मा. श्री. अमितभाई शहा, केंद्रीय रेल्वेमंत्री मा. श्री. अश्विनीजी वैष्णव, केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री मा. श्री. रावसाहेबजी दानवे, लाडके उपमुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस आदींसह सर्व मान्यवरांचेही मी आभार मानतो.या भव्य दिव्य अशा कोच फॅक्टरीचे लोकार्पण कार्यक्रमात सर्व लातूर लोकसभेतील जनतेने या नेत्रदीपक सोहळ्यास उपस्थित रहावे असे आवाहन खासदार सुधाकर शृंगारे यांनी केले आहे .

## दीड हजार एकरवर सभा घेऊन मराठ्यांची ताकद दाखवणार : मनोज जरांगे

पूर्णा: : मराठा आरक्षण देण्यासाठी सरकारने काढलेला सगेसोयरे अधिसूचनेचा कायदा नाही केल्यास येत्या काही दिवसांतच दीड हजार एकरावर मोठी सभा घेवून मराठ्यांची ताकद जगाला दाखवून देवू. त्यासाठी जागेची पाहणी चालू आहे. याकरीता मराठा बांधवांनी टीम तयार करुन गावे पिंजून काढत जनजागृती करावी. ओबीसीतून आरक्षण घेतल्याशिवाय मागे हटायचे नाही, असा निर्धार मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी केला.

# सतत मूड स्विंग्स होत आहेत? मग, रोज करा 'ही' योगासने

आपण पाहिले असेल की, अनेकदा लोकांसोबत असं घडतं की कोणत्याही कारणाशिवाय त्यांचा मूड खराब होतो किंवा त्यांना वाईट वाटू लागतं. एखाद्या व्यक्तीच्या मूडमध्ये अचानक मोठा बदल होत असेल तर त्याला मूड स्विंग म्हणतात.अशा स्थितीत व्यक्ती एका क्षणी आनंदी असेल तर दुसऱ्या क्षणी अचानक दुःखी होते. हे कोणाच्या बाबतीतही होऊ शकतं आणि याची अनेक कारणे असू शकतात.अशा परिस्थितीत मानसिक समस्यांवर योगासने खूप प्रभावी ठरू शकतात. मूड स्विंग्ज ही एक समस्या आहे ज्याचा बहुतेक महिलांना त्रास होतो. आज आम्ही तुम्हाला अशा काही योगासनाबद्दल सांगणार आहोत, जे मूड स्विंगच्या समस्येपासून मुक्त होण्यास मदत करतात.शष्कासन या आसनाच्या सरावाने राग आणि तणाव नियंत्रित होतो. शष्कासनाला शशांक आसन असेही म्हणतात, कारण या योगासनाच्या अभ्यासादरम्यान शरीराचा आकार सशासारखा होतो. त्याच्या फायद्यांबद्दल सांगायचे तर, हे केवळ मानसिक आरोग्यासाठी उपयुक्त



नाही तर पोट आणि कंबरेची चरबी कमी करण्यास देखील मदत करते.सिंहासन सिंहासनाचा सराव थायरॉईड ग्रंथींचा स्राव नियंत्रित करण्यासाठी उपयुक्त ठरतो. अशा परिस्थितीत, त्याचा नियमित सराव नकारात्मक भावना काढून टाकण्यास आणि आत्मविश्वास वाढविण्यास मदत करतो. यासोबतच नाक, कान, घसा या आजारांवरही ते फायदेशीर आहे.भुजंगासन भुजंगासनाच्या सरावाने फुफ्फुस मजबूत होतात, ज्यामुळे श्वासोच्छवासाच्या समस्यांपासून खूप आराम मिळतो. या योगाचा नियमित सराव केल्याने नकारात्मक विचार आणि मानसिक नैराश्यापासून आराम मिळतो. त्यामुळे जे लोक नेहमी नकारात्मक विचारांनी त्रस्त असतात त्यांनी भुजंगासनाचा सराव करावा.सर्वांगासन सर्वांगासनाचा सराव केल्याने थायरॉईडशी संबंधित विकार दूर होण्यास मदत होते. अशाप्रकारे, हे योगासन हार्मोनल असंतुलन नियंत्रित करण्यासाठी उपयुक्त आहे.

# चंद्रपूर लोकसभेसाठी इच्छुक असलेल्या काँग्रेसच्या शिवानी वडेट्टीवार कोण आहेत ?

नवी दिल्ली, : लोकसभा निवडणुकीचे पडघम वाजू लागले असताना सर्वच पक्षात इच्छुक उमेदवारांनी आपली दावेदारी ठेवायला सुरुवात केली आहे. महाराष्ट्रातील चंद्रपूर लोकसभा क्षेत्रातून राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या कन्या आणि युवक काँग्रेसच्या प्रदेश सरचिटणीस शिवानी वडेट्टीवार इच्छुक असल्याचे त्यांनी सांगितले. लोकसभा निवडणुकीत मी काँग्रेस कार्यकर्ता म्हणून तिकीट मागितल्याचे त्या म्हणाल्या. दिल्ली दौऱ्यावर असताना त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना शिवानी वडेट्टीवार म्हणाल्या की,





गेली सात– आठ वर्ष मी पक्ष संघटनेत काम करत आहे. युवक काँग्रेसच्या माध्यमातून अनेक महत्त्वाचे मुद्दे हाताळले आहेत. असे सांगतानाच युवकांनाही संधी मिळाली पाहिजे म्हणून आपण इच्छुक असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र पक्षाचा निर्णय हा अंतिम असेल असेही त्या म्हणाल्या. दिल्ली दौऱ्यावर असताना पक्षातील काही नेत्यांच्या त्यांनी भेटीही घेतल्या.विजय वडेट्टीवार यांच्याबाबत होत असलेल्या चर्चांचे त्यांनी खंडन केले. विजय वडेट्टीवार यांचे मूळ काँग्रेस आहे त्यामुळे कोणतेही नेते कुठेही गेले तरी विजय वडेट्टीवार काँग्रेसमध्येच असतील. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत पक्ष सोडण्याचा प्रश्नच येत नसल्याचे त्या म्हणाल्या. काँग्रेसची लढाई ही भाजपच्या विचारसरणीच्या विरुद्ध असलेली लढाई आहे. असेही शिवानी वडेट्टीवार म्हणाल्या.इलेक्टोरल बाँडबद्दलच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे शिवानी वडेट्टीवार यांनी स्वागत केले. सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय स्वागतार्ह असून या निर्णयाला कोणी विरोध केल्यास त्यांची मत स्पष्ट होतील, असेही त्या म्हणाल्या. काय आहेत चंद्रपूर लोकसभेची समीकरणे? २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत हंसराज अहिर यांचा काँग्रेसच्या बाळू धानोरकरांनी पराभव केला होता. त्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातुन निवडून आलेली काँग्रेसची एकमेव जागा होती. दरम्यान, काही दिवसांपूर्वी बाळू धानोरकर यांचे निधन झाले. त्यांच्या निधनानंतर या ठिकाणी पोटनिवडणूक झाली नाही. आगामी लोकसभा निवडणुकीत चंद्रपूर लोकसभा मतदारसंघातून काँग्रेसकडून बाळू धानोरकर यांच्या पत्नी आमदार प्रतिभा धानोरकर यांचे नाव चर्चेत आहे. सोबतच विजय वडेट्टीवार, त्यांच्या कन्या शिवानी वडेट्टीवार यांचेही नाव चर्चेत आहे. तर भाजपकडून या ठिकाणी माजी केंद्रीय मंत्री हंसराज अहिर किंवा महाराष्ट्र सरकारमधील मंत्री सुधीर मुनगंटीवार यांना मैदानात उतरवले जाऊ शकते.

# साहित्य कलाकृती जोपासणारा वर्दीतील मनमिळाऊ माणूस...

कवी – साहित्यिक : उत्तमराव तरकसे (असरडोहकर) यांना यंदाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार १२ मार्च २०२४ रोजी मुंबई येथील सभागृहात सन्मानित करण्यात येणार...!

नवी मुंबई / के. एच. हनवते :– वाचन हा मनाचा उत्तम व्यायाम आहे. वाचनाने मनाची, बुद्धीची मशागत होते असं थोर लेखक रिचर्ड स्टिल म्हणतात. आजमितीस धकाधकीच्या मानवी जीवनात व्यक्ती उन्नतीला, समाज विकासाला, राष्ट्र उत्कर्षाला वाचन हे नितांत आवश्यक आहे. भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले, वाचाल तर वाचाल...हे एक अतिशय प्रसिद्ध असे वाक्य वाचन व साहित्याचे महत्व अधोरेखित करणारे आहे.

वाचाल तर वाचाल, हे तीन शब्द प्रत्येकाच्या जीवनाचे यश धारण करतात. मात्र आजच्या धकाधकाची व सोशल मिडीयाच्या युगात वाचनापासून लोकं दूरावलेली असतांनाही नवी मुंबई पोलिस दलात कार्यरत असलेल्या उत्तम दासू तरकसे आसरडोह या वर्दीतील व्यस्त माणसाने शासकीय नोकरी सांभाळतांनाच साहित्य संस्कृती जोपासण्यावर भर दिला आहे.

नवी मुंबई पोलिस दलाच्या गुन्हेशाखेत कार्यरत असलेले पोलिस अंमलदार उत्तम दासू तरकसे यांचा जन्म मराठवाड्यातील दुष्काळी भाग म्हणून ओळखल्या जाणार्या बीड जिल्ह्यामधील धारूर तालुक्यातील आसरडोह नावाच्या अतिशय दुर्गम अशा खेडेगावी झाला. कालांतराने पोलिस दलातील नोकरीनिमित्त ते नवी मुंबईत स्थायिक झाले व गेले २८ वर्ष महाराष्ट्र पोलीस दलात कार्यरत राहून कायदा व सुव्यवस्था राखण्याची व्यस्त अशी जबाबदारी पार पडत असतांनाच त्यांनी आपल्यातील वाचन संस्कृतीही कायम टिकवून ठेवली आहे. शैक्षणिक जीवनात साहित्याचा त्यांना छंद जडला होता व तो आजही पोलिस दलातील कर्तव्य बजावत असतांना ते जोपासण्याचा प्रयत्न करत आहेत व त्यातूनच त्यांच्या लेखनीतून भीम.गीतांजली. धुळीतून शिखराकडे, नुकताच शाईची नोंद ' असे कवितासंग्रह व पुस्तकांची निर्मिती होवून ते प्रकाशित झाले आहेत. तर काही पुस्तक प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. साहित्य लेखनाचा अंगी असलेला हा गुण त्यांना स्वस्थ बसू देत नसल्यामुळे आजवर मी हे साहित्य लेखन करू शकलो असे पोलिस अंमलदार उत्तम तरकसे सांगतात. साहित्य लेखनाच्या या कामगिरीबद्दल आजवर त्यांना अनेक सामाजिक संस्थांकडून गौरविण्यात आले आहे. यात जीवन गौरव, महाराष्ट्र गौरव, क्रांती प्रेरणा, पद्मश्री दया पवार , संत गाडगेबाबा पुरस्कार, पनवेल महानगरपालिका व अहमदनगर महानगरपालिका यांच्याकडून झालेला सन्मान, तर नकताच राजमाता जिजाऊ पुरस्कार २०२३ आष्टी जिल्हा बीड येथे त्यांना बहाल करण्यात आला आहे. तसेच पुणे कोथरूड येथून गरुड झेप या पुरस्काराने ते सन्मानित झाले आहेत. एकंदरीत त्यांच्या लेखनीतून पुढे आलेल्या या साहित्य कृतींची अनेक संस्थानी दखल घेत, त्यांना अनेक मानाच्या पुरस्कारांनी सन्मानित केले आहे.




गुन्हेगारांवर वचक निर्माण करणारा व आपल्या कृतीतून नेहमी समोरच्या व्यक्तीच्या ( गुन्हेगारी प्रवृत्तीच्या)मनात धडकी निर्माण करणारा घटक म्हणजे पोलिस होय. मात्र असे असले तरी उत्तम तरकसे यांच्या व्यक्मित्वामध्ये साहित्यिक दडलेला असल्याने त्यांना लेखनाची आवड काही केल्या स्वस्थ बसू देत नाही म्हणून आजवर पोलीस दलाची सेवा बजावत असतांना साहित्य कला जोपासण्याचे महद कार्य त्यांच्याकडून होतांना दिसत आहे. तसेच सामाजिक ,शैक्षणिक सेवा, आदिवासी, दिव्यांग व आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकाचे सेवा करण्यावर त्यांचा कायम भर राहिला आहे.

लहान मुलांना कथा खूप आवडतात. कथेतून संस्कार करणे व मूल्य रुजवणे सहज सोपे असते. मात्र आजमितीस वाढत्या मोबाईलकरणामुळे मुले टीव्हीवर, मोबाइलवर विविध कार्टून्स, गेम्स, रील्स बघतात. यातील हिंसक व मारामार्या करणार्या प्रसंगांचा मुलांच्या बाल मनावर वाईट परिणाम होतो.व्हिडिओ, गेम्स, रील्स यांनी मुलांच्या मन आणि बुद्धीवर ताबा मिळवला आहे. एकंदरीत या माध्यमांनी एकप्रकारे आपली मुलेच चोरली आहेत. याउलट मुलांना गोष्टी सांगितल्या किंवा वाचायला लावल्या तर मुले देखील गोष्टीतील नायकाप्रमाणे आपणही शूरवीर व्हावे, सद्वर्तनी व्हावे असा विचार करतात. आपल्या मुलांचे खरे नायक महापुरुष, शास्त्रज्ञ, विचारवंत होण्यासाठी वाचनच आवश्यक आहे असे उत्तम तरकसे हे सांगतात.

# यकृत निरोगी आणि तंदुरुस्त ठेवायचंय? मग 'या' औषधी वनस्पतींचा आहारात करा समावेश

यकृत हा शरीराचा सर्वात महत्वाचा अवयव आहे. हे शरीराला डिटॉक्स करते, पचनास मदत करते आणि तुम्हाला निरोगी आणि तंदुरुस्त ठेवते. यकृत निरोगी ठेवण्यासाठी, निरोगी आहार आणि चांगली जीवनशैली आवश्यक आहे. अनहेल्दी सवयींमुळे, तुम्हाला फॅटी लिव्हर, कावीळ आणि हिपॅटायटीस सारख्या समस्यांना सामोरे जावे लागू शकते.आपण निरोगी यकृतासाठी आयुर्वेदिक उपाय देखील वापरू शकता. तुम्ही आहारात आयुर्वेदिक औषधी वनस्पती आणि पदार्थांचा समावेश करू शकता. यामुळे यकृत निरोगी राहण्यास मदत होईल.यकृत निरोगी ठेवण्यासाठी योग्य आहार आणि जीवनशैली महत्त्वाची भूमिका बजावते. यामध्ये काही औषधी वनस्पतीही फायदेशीर आहेत. येथे आम्ही तुम्हाला अशाच २ औषधी वनस्पतींबद्दल सांगत आहोत, जे यकृताच्या आरोग्यासाठी महत्त्वाच्या आहेत.आवळा आवळा हे यकृताच्या आरोग्यासाठी चांगले आहे. हे यकृतातील कोणत्याही प्रकारचे विषारी पदार्थ नैसर्गिकरित्या काढून टाकते आणि यकृताचे आरोग्य आणि कार्य सुधारते. तुम्ही अर्धा चमचा आवळा पावडर कोमट पाण्यासोबत रिकाम्या पोटी किंवा जेवणानंतर २ तासांनी घेऊ शकता.भृंगराज यकृताचा आकार वाढला असेल, फॅटी लिव्हर किंवा कावीळची



समस्या असेल तर ती दूर करण्यासाठी भृंगराज मोठ्या प्रमाणात मदत करू शकते. दिवसातून १–२ वेळा कोमट पाण्यासोबत भृंगराज घेऊ शकता.त्रिफळा झोपायला जाण्यापूर्वी रोज एक चिमूटभर पावडर त्रिफळाचे सेवन केल्याने तुमचे चयापचय वाढेल. हे तुमचे रक्त शुद्ध करेल आणि तुमचे शरीर डिटॉक्सिफाई करेल.

# रेतीची सर्रास साठेबाजी सुरू, तहसीलदारांनी लक्ष देण्याची मागणी



किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) शनिवारपेठ ते दाभाडी जाणाऱ्या रस्त्याला लागूनच जवळपास पंचवीस टिप्परचा रेतीसाठा करण्यात आला आहे. महसूल विभागाचे कर्मचारी परिक्षाकेंद्रावर गुंतून असल्याच्या आणि लागोपाठ कार्यालयाला सुटचा असल्याच्या संधीचा फायदा रेती चोरटे घेत आहेत. तहसिलदार शारदा चोंडीकर यांनी रेती तस्करी रोखण्यासाठी ठोस पाऊल ऊचलून कर्मचाऱ्यांच्या पाठीशी उभा राहाण्याची गरज असल्याचे नागरीकांचे म्हणने आहे. सहायक जिल्हाधिकारी आणि तहसिलदार. या दोन्ही अधिकाऱ्यांनी त्यांच्या वाहन चालकांना माहिती न देता अचानक रेतीसाठ्यांवर धाडी घातल्यास तस्करीवर आळा बसण्यास मदत होऊ शकते असे अनेकांचे म्हणने आहे. किनवट, गोकुंदा, बोधडी, इस्लापूर, सारखणी, मांडवी, चिखली फाटा, ठिकाणी रात बे रात सामान्य नागरिकांच्या झोपी उध्वस्त होत आहे अशा चोरटचा रेतीचा मोठ्या प्रमाणात पुरवठा होत असतो. पैनगंगेसह विविध नदीनाल्यातून रेतीचा भरमसाठ उपसा चालू आहे. तालुक्यातील एकाही रेतीघाटाचा कांही वर्षापासून लिलाव झालेला नाही. शासकीय रेतीडेपो तयार करण्याचा आदेश वांझोटी वल्गना करली. अधिकाऱ्यांचेही दूर्लक्ष आणि कांही कर्मचाऱ्यांची भ्रष्ट प्रवृती ही रेतीतस्करीला तारक ठरल्यामुळे रेतीतस्करी प्रचंड वाढली आहे. कांही तलाठी जीव धोक्यात घालून रात्रंदिवस रेती गाड्यांची धरपकड करतात तर कांही रात्रंदिवस डोळ्यात तेल घालून अथक मेहनत घेऊन रेतीच्या गाड्या धरुन मलिदा घेऊन सोडतात, अशी ग्रामिण भागातील कांही लोकांची ओरड आहे. वेगवेगळी भरारी पथके तयार करुन गाडचा धरण्याची मोहीम आखल्यास शेकडो वाहाने जप्त होतील आणि लाखांचा महसूलही प्राप्त होईल. मार्च अखेरचे उद्दिष्ट्यपुर्तीसाठी कांही गाडचांवर देखाव्यासाठी कारवाई करुन रायल्टी वसूल करुन पुन्हा धंद्यांना प्रेरत केले जाइलही. परंतू कायमचा बंदोबस्त केला जाणार नाही.

शनिवारपेठ ते दाभाडी मार्गावरील रेतीसाठ्यावर काय कारवाई होणार याकडे लोकांचे लक्ष लागून आहे. मागिल वर्षी तहसिलदार डॉ. मृणाल जाधवांनी धाडसाने पुढे येऊन रेतीसाठे जप्त केले त्यानंतर पुढे काय झाले याचा थांग पत्ता लागला नाही.

# मान्य. कांशिराम साहेब यांच्या जयंती निमीत्त १५ मार्च २०२४ रोजी लातूरात जाहिर व्याख्यान



लातूर – येथील बार्शी रोडवरील संविधान चौकात बहुजन नायक मान्य.कांशिराम साहेब यांच्या ८९ व्या जयंती निमीत्त शुक्रवार दि.१५ मार्च २ज२४ रोजी सायं. ०६.०० वा.जाहिर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

लातूर शहरातील गुरू रविदास महाराज आणि मान्य.कांशिराम साहेब जयंती समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात जो बहुजन की बात करेगा, वो दिल्ली से राज करेगा या विषयावर जाहीर व्याख्यान होणार असून सुप्रसिद्ध अभ्यासक तथा वक्ते प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे अध्यक्षपद भूषविणार आहेत. तसेच अंबाजोगाईचे सुप्रसिद्ध वक्ते तथा आंबेडकरी चळवळीचे भाष्यकार आर. डी. जोगदंड हे यावेळी आपले विचार मांडणार आहेत. यावेळी प्रमुख उपस्थिती प्राचार्य आर.डी.निटूरकर,कास्ट्राईब संघटनेचे राज्य सचिव यु.डी. गायकवाड आणि भटके – विमुक्त चळवळीचे नेते प्रा.सुधीर अनवले आदी मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

या कार्यक्रमास उपस्थित राहाण्याचे अवाहन जयंती समितीचे पदाधिकारी सर्वश्री प्रा.सुभाष भिंगे, नरसिंग घोडके, ॲड. विजयकुमार चिखलीकर, प्रा. डॉ. हर्षवर्धन कोल्हापुरे, प्रा. डॉ. अशोक नारनवरे, ॲड.दीपक साठे, इंजि. श्रीधर शेवाळे, प्रा.डॉ. सखाराम वाघमारे, बाबुराव वाघमारे, प्रा. युवराज वाघमारे, डी.एस. सूर्यवंशी, बाबुराव भाले, शिरीष दिवेकर,बाबुराव (आबा) कांबळे, इंजि.श्याम वाघमारे, ॲड. सोमेश्वर वाघमारे, प्रा.मकबूल शेख, बालाजी साबळे, खंडू बनसोडे, सुभाष सूर्यवंशी, धर्माजी उदबाळे, यांनी केले आहे.

# जागतिक महिला दिन व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त शारदा वृद्धसेवाश्रमने जपली सामाजिक बांधिलकी!



सांगली : दिपगंगा भागीरथी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, महाराष्ट्र राज्य संचलित.. शारदा वृद्धसेवाश्रम शाखा मिरज यांचे वतीने जागतिक महिला दिन आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त मा. भास्कर सदामते आणि सौ. अलका सदामते यांचे सहकार्याने आस्था बेघर महिला निवास केंद्र, मिरज येथे रहिवास करत असलेल्या ७० निराधार, बेघर, अनाथ, वंचित, परितक्त्या आणि भटक्या भिकारी माता भगिनींना द्राक्षे आणि कपडे वाटप करण्यात आले. भारताच्या स्त्री शिक्षणाची गंगोत्री म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारतातील पहिल्या मुख्याध्यापिका सावित्रीबाई ज्योतीराव फुले. स्त्री शिक्षणासा विरोध, अस्पृश्यता, जातीयता अश्या अमानुष रुढी–परंपरा व कर्मकांडाविरुद्ध ज्योतिबांचे मन पेटून उठत असे. तेंव्हा ज्योतिबांच्या मनातील पेटत्या ज्योतिला प्रज्वलीत करण्याचे खरे कार्य क्रांतीज्योतीसावित्रीमाईनेचकेले.शिक्षणाच्या प्रसारासाठी अन्य सामाजिक क्षेत्रांतही काम करणे आणि स्त्रियांचा आत्मविश्वास वाढवणे गरजेचे आहे. हे सावित्रीबाईंनी ओळखले. महाराष्ट्रातील स्त्रीशिक्षणाच्या आरंभिक टप्प्यात पती जोतिबा फुले यांच्या सहकार्याने त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात आभाळा एवढी क्रांती घडवून आणली. सन १८९७ मध्ये पुण्यात प्लेगच्या साथीने थैमान घातले होते. तेंव्हा या जीवघेण्या आजाराने अनेकांचे जीव घेतले. त्यातून उद्भवणारे हाल ओळखून प्लेग पीडितांची सेवा करताना, सावित्रीबाईंनाही प्लेगची लागण झाली आणि १० मार्च १८९७ रोजी वयाच्या ६६ व्या वर्षी त्यांची प्राणज्योत मालवली. पण जगाच्या पाठीवर त्या ज्ञानज्योती म्हणून युगानुयुगे अजरामर राहिल्या. या पुढेही सदैव राहतील.

भारतमातेच्या ज्या मातीत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले या ज्ञानप्रसारक उभयतांचा जन्म झाला. त्याच भारतमातेच्या मातीत आपणही जन्माला आलो. त्या भारतमातेचे आणि इथल्या मानव समाजाचे आपण कांहीतरी देणं लागतो. समाजभान राखून ते देणं देण्याचा एक छोटासा प्रयत्न म्हणून आज आम्ही आधुनिक, वैज्ञानिक, मानवतावादी व धर्मनिरपेक्ष शिक्षणाच्या पहिल्या पुरस्कर्त्या ज्ञानाई सावित्रीमाई फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त द्राक्षे आणि कपडे वाटप केले.

सदर द्राक्षे आणि कपडे वाटप प्रसंगी मा.भास्कर सदामते, सौ.अलकाताई सदामते या उभयतांचे अनमोल सहकार्य लाभले. आस्थाचे संचालक मा. शाहीन शेख, शारदा वृद्धसेवाश्रम च्या संचालिका तथा अनाथांच्या नाथ समाजसेविका मा. शारदा लोंढे, दिपगंगा भागीरथी संस्थेचे संस्थापक, अध्यक्ष तथा साहित्यरत्न, समाजरत्न दिपक लोंढे, आशिष सदामते आणि अस्थाच्या माता भगिनीं उपस्थित होत्या. आस्थाचे संचालक मा. शाहीन शेख यांनी सर्वांचे आभार मानले.

# सुशिल वाघमारे राष्ट्रीय गुणवंत शिक्षक पुरस्काराने सन्मानित.



चाकूरः येथील शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणारे सुशिल रंगनाथ वाघमारे यांना रविवारी पुणे येथे राष्ट्रीय गुणवंत शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

काव्यमित्र संस्था पुणे यांच्या वतीने प्रतिवर्षी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतीदिनाचे औचित्य साधून राष्ट्रीय गुणवंत शिक्षक पुरस्कार देण्यात येतो. पुरस्काराचे हे २४ वे वर्ष आहे. या वर्षीचा पुरस्कार सामाजिक , सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणारे आदर्श शिक्षक, सुशिल रंगनाथ वाघमारे स्वामी विवेकानंद विद्यालय, चापोली यांना पुणे येथील सायन्स पार्क तारांगण येथे विविध मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी शिरीष पोरेडी ( कार्यकारी अभियंता पिंपरी चिंचवड मनपा) , रश्मी कुमार अब्रोल (ज्येष्ठ कृषी तज्ञ पुणे), डॉ. अंजली शिवदे(प्रसिद्ध डॉक्टर पुणे) ड. मधुरा देशपांडे प्रसिद्ध कायदा तज्ञ पुणे, सुचित्रा साठे, राजेंद्र सगर संस्थापक काव्यमित्र संस्था पुणे यांच्या उपस्थितीत करण्यात आला. सुशील वाघमारे हे मागील तेरा वर्षापासून शैक्षणिक क्षेत्रामध्ये कार्यरत आहेत. आनंददायी शिक्षण देऊन विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचा कार्य ते करत आहेत. कब बुलबुल,स्काऊट गाईड, चित्रकला, हस्तकला याचबरोबर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ते प्रयत्नशील असतात. यापूर्वी त्यांना 'लातूर भूषण पुरस्का, विठ्ठलराव शिंदे गुरुजी स्मृती पुरस्कार, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार, जिल्हा परिषद माहोरवाडी द्वारा ज्ञानरत्न प्रेरणा पुरस्कार प्राप्त झाले आहेत. महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी जनसामान्यांच्या घरात शिक्षणाची गंगा पोहोचली म्हणून आज अनेक वेळा आनंदाने शिक्षण घेत आहेत याचा ध्यास उराशी बाळगून सुशिल वाघमारे शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करत आहेत. या कार्याची दखल घेऊनच ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मृतिदिनाच्या औचित्य साधून संस्थेने चोविसाव्या वर्षी आयोजित केल्या या कार्यक्रमात २०२४ या वर्षाचा राष्ट्रीय गुणवंत शिक्षक पुरस्कार सुशील रंगनाथ वाघमारे यांना आदरपूर्वक प्रदान करण्यात आला. याबद्दल सामाजिक राजकीय शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांच्या वतीने त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# नवभारत अचिव्हर्स अवॉर्ड्स पुरस्काराने ऋषिकेशदादा कराड दुबई येथे सन्मानित




लातूर :– नवभारत मीडिया समूहाच्या वतीने युएई राजघराण्यातील वरिष्ठ सल्लागार डॉ. अर्शी अयुब मोहम्मद झवेरी यांच्या शुभहस्ते लातूर येथील युवा उद्योजक तथा भाजयुमोचे प्रदेश सचिव ऋषिकेश रमेशअप्पा कराड यांना नवभारत अचिव्हर्स अवॉर्ड्स अंतर्गत नवभारत व्यवसाय उत्कृष्टता पुरस्कार २०२४ हा पुरस्कार देऊन दुबई येथील हयात रिजेंसी क्रीकसाइड या पंचतारांकित हॉटेल मधील आलिशान हॉलमध्ये ९ मार्च रोजी सन्मानपूर्वक कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले.

स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्य चळवळीच्या समर्थनार्थ, नवीन भारताचे स्वप्न उराशी बाळगून सुरू करण्यात आलेला नवभारत हा भारत देशातील सर्वात मोठा मीडिया समूह आहे. देशभरातील विविध आवृत्तीच्या लाखो वाचकांच्या गरजा पूर्ण करण्याबरोबरच समाज जीवनातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय आणि प्रेरणादायी काम करणाऱ्या मान्यवरांचा यथोचित सन्मान नवभारत मीडियाच्या माध्यमातून दुबई येथे ९ मार्च २०२४ रोजी करण्यात आला. या सन्मान सोहळ्यात देशभरातील २७ जणांना नवभारत अचिव्हर्स अवॉर्ड्स २०२३ हा पुरस्कार देण्यात आला त्यात लातूर येथील युवा उद्योजक ऋषिकेश रमेशआप्पा कराड नवभारत अचिव्हर्स अवॉर्ड्स अंतर्गत नवभारत व्यवसाय उत्कृष्टता पुरस्कार २०२४ हा पुरस्कार युएई राजघराण्यातील वरिष्ठ सल्लागार डॉ. अर्शी अयुब मोहम्मद झवेरी यांच्या शुभहस्ते देऊन सन्मान करण्यात आला.

अध्यात्मिक, सामाजिक आणि वैचारिक विचाराचा पगडा असलेल्या कराड कुटुंबात जन्मलेले आणि या कुटुंबाचा संस्कार घेवून ऋषिकेशदादा कराड यांनी आत्मनिर्भर भारत या संकल्पनेतून शेतीवर आधारित कौशल्या सिल्क रिलिंग उद्योगाची उभारणी केली. तरुणांनी नोकरीच्या मागे न लागता उद्योग क्षेत्रात भरारी घ्यावी या संकल्पनेतून भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी प्रोत्साहन दिले. कौशल्या सिल्क रिलिंग उद्योगातून जवळपास १५० स्त्री–पुरुषांना रोजगार उपलब्ध करून दिला. या उद्योगावर आधारित बहुसंख्य शेतकऱ्यांची तुती लागवडीच्या माध्यमातून आर्थिक उन्नती करण्याचा प्रयत्न ऋषिकेशदादा कराड करीत आहेत. मराठवाड्यात पहिल्यांदाच मोठ्या प्रमाणात रेशीम उद्योगाची उभारणी केल्याने अनेकजण या प्रकल्पाची पाहणी करून पाठीवर कौतुकाची थाप देत आहेत. याबरोबरच गीर गाईंच्या दूध डेअरीमध्ये लक्षणीय कामगिरी दाखवत आहेत. रामेश्वर येथील संत गोपाळबुवा महाराज शुगर ॲण्ड ॲग्रो फूड इंडस्ट्रीजचे ते संस्थापक संचालक असून, वायुपुत्र श्री हनुमान व्यायामशाळेचे सल्लागार आहेत. लातूर येथील श्रीधन्वंतरी वैद्यकीय महाविद्यालय कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे संचालक म्हणून काम पाहत असतानाच गोरगरीब रुग्णांना वेळोवेळी एमआयटी मेडिकल कॉलेज आणि यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयाच्या माध्यमातून मदतीचा हात दिला. अनेक वैद्यकीय तपासणी शिबिरे आयोजित करून त्यांनी ग्रामीण भागात आरोग्य सेवा दिली आहे.

सामाजिक क्षेत्राबरोबरच राजकीय क्षेत्रातही आपला वेगळा ठसा निर्माण करण्याचा प्रयत्न ऋषिकेशदादा कराड हे करत आहेत भारतीय जनता युवा मोर्चाच्या प्रदेश सचिव पदाची त्यांच्यावर जबाबदारी असून तरुणांना बदलते शिक्षण, रोजगाराच्या संधी यासह विविध क्षेत्राशी निगडित सातत्याने चर्चासत्र मार्गदर्शन मेळावे घेत आहेत. युवा चळवळीत त्यांचे मोठे योगदान आहे. लातूर ग्रामीण विधानसभा क्षेत्रातील नमो चषक कला क्रीडा स्पर्धेचे मुख्य संयोजक म्हणूनही त्यांनी स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली. ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात विविध स्पर्धाचे नियोजन करून ग्रामीण खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला.

विविध धार्मिक व सामाजिक कार्यातही सतत हिरीरीने भाग घेतात. या सर्व कामाची दखल घेऊन नवभारत मीडिया यांनी युवा उद्योजक ऋषिकेश रमेशआप्पा कराड यांना नवभारत अचिव्हर्स अवॉर्ड्स अंतर्गत नवभारत व्यवसाय उत्कृष्टता पुरस्कार २०२४ हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले सदरील पुरस्कार मिळाल्याबद्दल ऋषिकेशदादा कराड यांचे अनेकांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

# मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' अभियानात तुळजाभवानी विद्यामंदिर लातूर तालुक्यात प्रथम

लातूर, दि.११– 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' अभियान अंतर्गत घेण्यात आलेल्या स्पर्धेत येथील तुळजाभवानी प्राथमिक विद्यामंदिरने लातूर तालुक्यात खाजगी व्यवस्थापन शाळा गटात सर्वप्रथम क्रमांक पटकवला आहे.तुळजाभवानी विद्यामंदिरच्या मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे यांच्या नेतृत्वात या शाळेने राबविलेली शैक्षणिक गुणवत्ता, डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर, तुळजाभवानी विद्यार्थी बचत बँक, शिक्षक व विद्यार्थी यांची आरोग्य तपासणी, स्वच्छता मॉनिटरनी स्वच्छतेविषयी २१० व्हिडीओ फेसबुकवर अपलोड केले. प्लास्टिक व तंबाखूमुक्त अभियान, 'मेरी माटी मेरा देश', अमृतकलश, वीजबचत, जलपुनर्भरण, व्यसनमुक्ती, पाच अनाथ मुलांना दत्तक घेतले, यासह या शाळेने विविध उपक्रम राबविले. सदर अभियानात स्पर्धेसाठी पात्र होण्यासाठी आवश्यक विविध निकष पूर्ण केल्याने तुळजाभवानी विद्यामंदिरने हे यश प्राप्त केले आहे. या उपक्रमांची तपासणी पथकाने दखल घेतली व तुळजाभवानी विद्यामंदिर खाजगी व्यवस्थापनाची शाळा लातूर तालुक्यात सर्वप्रथम आली आहे.या यशाबद्दल माजी मंत्री, आमदार अमित देशमुख, आमदार रमेश कराड, आमदार संभाजी पाटील – निलंगेकर, शिक्षक आमदार विक्रम काळे, शिक्षण संचालक कार्यालयातील शिक्षण उपसंचालक वंदना वाहूळ, शिक्षण उपसंचालक गणपतराव मोरे, विभागीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष सुधाकर तेलंग, सहायक शिक्षण संचालक दत्तात्रय मठपती, शिक्षणाधिकारी नागेश मापारी, शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, गटविकास अधिकारी तुकाराम भालके, गटशिक्षणाधिकारी संजय पंचगल्ले, तालुका मूल्यांकन समितीचे सचिव निवृत्ती जाधव, सी. एस. म्हेत्रे, एस. बी. सूर्यवंशी, डी. जी. शिंदे, एस. जी. क्षीरसागर, वसंत पाटील, रामदास पवार, जे. जी. सगरे, मुख्याध्यापक संघटनेचे अध्यक्ष प्रकाश देशमुख, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील डॉ. वैजयंता पाटील, प्राचार्य डी. एन. केंद्रे, संस्थेच्या सचिव के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, संस्था सदस्य उपप्राचार्या कविता केंद्रे, अश्विनी केंद्रे, वैशाली केंद्रे, करिश्मा केंद्रे, प्राचार्य जी. आर. मुंडे, राजेंद्र जायेभाये, राजीव मुंढे, डॉ. जी. आर. नागरगोजे, प्रशांत बोंदर यांनी मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे व शिक्षकांचे कौतुक केले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE